# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २५८ I बुधवार १ जुलै २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


## इडा, पिंगला व सुषुम्ना



'सहजयोग'

भाग ९६

समजा हि कुंडलिनी अशी मध्य मार्गात आहे इथे ,हि डावी आणि उजवी ह्या आपल्या दोन इडा आणि पिंगला अशा दोन नाड्या आहेत ज्यांनी सिम्फथॅटिक नर्व्हस सिस्टम बनतात आणि मधोमध मध्य मार्ग आहे ज्याला आपण सुषुम्ना नाडी म्हणतो पण डॉक्टर याला पॅरासिम्फथेटिक नर्व्हस सिस्टम म्हणतात . तर जेव्हा ह्या जो कोणी साधक असेल त्याची जेव्हा इच्छा अति होते तेव्हा डावीकडची बाजू चालू होते . आणि ती अशी हटल्या मुळे इथे हि पोकळी खराब होते . दुसरा जर एखादा माणूस जर असा विचार करेल कि मला पुढे काय करायचं आहे . मला हे कार्य करायच आहे मला ते कार्य करायच आहे . सारखा त्याचा असा विचार चालू असेल . त्याला आपण अतिकर्मी म्हणतो त्याला कृष्णाने सांगितलं आहे अतिकर्मी नसला पाहिजे . त्याची हि राईट साईड उजवी कडे अशी जास्त जाऊन त्यांनी सुध्दा मध्य मार्ग बंद होतो . तर कोणत्याही अतिशय गोष्टीला गेल्यामुळे हे चक्र जे मधोमध आहे ते चक्र विस्कळीत होत आणि त्या विस्कळीत पणा मुळेच आपल्याला आजार होतात . जर आपण हि कुंडलिनी जागृत केली तर ती बरोबर ह्या चक्राना अशी जस काही माळेमध्ये आपण मणी ओवतो तशी ती ओवत चालते . आणि ते ओवल्या बरोबर ती सर्व चक्रे मधोमध येतात . आणि त्या मधोमध आलेल्या चक्रांमध्ये जेव्हा ह्या देवता जागृत होतात तेव्हा त्या चक्रांच्या ज्या शक्त्या आहेत त्या आपल्यातून वाहू लागतात.

१५ डिसेंबर १९८८,पुणे

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# बाल गुन्हेगारांची वयोमर्यादा १६ करणार ; प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवणार : मुख्यमंत्री फडणवीस

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** बाल गुन्हेगारांसाठीची वयोमर्यादा १८ वर्षांवरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. बालकांचा गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या वितरणासाठी वापर करणाऱ्यांविरोधात अधिक कठोर कारवाई करता यावी, यासाठी कायद्यात आवश्यक बदल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

जालना जिल्ह्यात अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीकडे वाढता कल याबाबत सदस्य अर्जुन खोतकर यांनी विधासभेत प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनीही उपप्रश्न विचारत या प्रश्नाच्या चर्चेत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लातूर येथे घडलेली घटना वैयक्तिक स्वरूपाची असून ती कौटुंबिक वादातून घडली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून, तपासात सहभाग निष्पन्न झालेल्या विधिसंघर्षित बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे. मात्र, विधिसंघर्षित बालकांना अटक न करता बालगृहात ठेवण्याच्या तरतुदीचा गैरफायदा काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घेत आहेत. अशा प्रवृत्तीचे लोक बालकांकडून गुन्हे घडवून आणण्यासाठी त्यांचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, १६ वर्षांखालील बालकांकडूनही गंभीर गुन्हे होत असल्याचे निदर्शनात आले आहे.



या पार्श्वभूमीवर बालगुन्हेगारीच्या वाढत्या प्रवृत्तीचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्यात येणार आहे. तसेच बालकांचा वापर करणाऱ्या टोळ्या आणि संघटित गुन्हेगारीत सहभागी असलेल्या व्यक्तींवर संघटित गुन्हेगारीविषयक कठोर कलमे लावण्याबाबत आणि संबंधित कायदे अधिक प्रभावी करण्याबाबतही विचार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले

या संदर्भातील एका उपप्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, बालगुन्हेगारी रोखण्यासाठी राज्यात विविध प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पोलीसांकडून शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी जनजागृती, समुपदेशन, सायबर सुरक्षा तसेच व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन केले जाते. संवेदनशील भागांमध्ये नियमित गस्त आणि प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

राज्यमंत्री कदम म्हणाले की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पथके स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून उअठए (र्ऊीपीशश्रश्रळपस रपव ठशषेऑरींळींश एर्वीलरींळेप) कार्यक्रम राबवून विधिसंघर्षित बालकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तसेच, निरीक्षण गृहांमध्ये अशा बालकांच्या संरक्षण, शिक्षण, समुपदेशन, व्यक्तिमत्त्व विकास आणि पुनर्वसनावर विशेष भर दिला जात आहे.

# ठाकरेंचे कट्टर सचिन अहिर शिंदेंच्या शिवसेनेत!

## विधानपरिषदेच्या उपसभापती पदासाठी भरला उमेदवारी अर्ज

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच आमदार आदित्य ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू मानले जाणारे आणि मुंबईत मोठं राजकीय प्रस्थ असणारे सचिन अहिर यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करीत मंगळवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

शिंदे यांच्या शिवसेनेकडून विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीत त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, मंत्री प्रताप सरनाईक, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलम गोऱ्हे, खासदार ओमराजे



निंबाळकर, प्रवक्ते किरण पावसकर, राहुल लोंढे, शीतल म्हात्रे तसेच शिवसेना नेते, उपनेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

महायुतीकडे बहुमत असल्याने अहिर हे १ जुलै रोजी विधानपरिषदेचे उपसभापती म्हणून निवडले जातील. हा प्रवेश करीत असताना अहिर यांनी शिवसेनानेते आदित्य ठाकरे आणि अंबादास दानवे याना मॅसेजद्वारे आपण वैयक्तिक नवा राजकीय पर्याय निवडत असल्याचे सांगत त्यांनी शिवसेनेतील आपल्या सर्व पदांचा राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे.

सहा खासदार फुटल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या मतदारसंघ पिंजून काढला. तिथे कार्यकर्ता मेळावा घेतला आणि खासदारांवर टीकेची झोड उठवली. ते दौरा आटपून परत येत नाही तोच आज ठाकरे सेनेला त्यांनी मुंबईत मोठा धक्का दिला.

सन २०१९ मध्ये सचिन अहिर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून शिवसेनेत प्रवेश केला होता. सचिन **(पान ४ वर)**

### हिंदू मंदिरं लुटणाऱ्यांसोबत तुम्ही कसे बसू शकता?

मी गेले ४ दिवस पाहातोय, जवळच्या लोकांना सगळं मिळतंय. वरळी शिवडी हा शिवसेनेचा बालेकिल्ला होता आणि अजूनही आहे. कोणी येण्याने जाण्याने पक्षाला धक्का बसत नाही. आदित्य ठाकरे बोलूच नाही शकत असं आता हे म्हणून शकत नाहीत. अजून काय पाहिजे तुम्हाला, प्रभाग समिती, बेस्ट, शिवसेनेत उपनेतेपद आहे, युनियन अध्यक्ष एवढं सगळं दिलंय. अजून काय पाहिजे? हा प्रश्न आहे, आता आरत्याच करायच्या का? भेटत नव्हतो का? तर असं पण नाही आहे, कारण मी त्यांच्यासोबतच असायचो. मनात नैराश्य होतंच, पुढे काय होणार? संविधान बदलणार का? खासदार गेलेत, आज हे गेलेत, आपली मंदिरं लुटत आहेत. हिंदू मंदिरं लुटणाऱ्यांसोबत तुम्ही कसे बसू शकता? संविधान बदलणाऱ्यांसोबत कसे बसू शकता?

**– आ. आदित्य ठाकरे**

### १४ आमदार, ४५ नगरसेवक...

**निलेश राणे, सचिन आहीर होते म्हणूनच आदित्य ठाकरे हे वरळीतून निवडून यायचे. सचिन आहीर हे वरळीचे माजी आमदार होते. आता सचिन आहिर हेच आमच्य पक्षात आल्यामुळे आदित्य ठाकरेंना झोप लागणार नाही. त्यांचे भविष्यात निवडून येणे मुश्कील आहे, असा टोला निलेश राणे यांनी लगावला. आमच्याकडे येणाऱ्यांची यादी मोठी आहे. ही संख्या मोठी आहे. एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रातील लोकप्रिय नेते आहेत. महाराष्ट्रातील जेवढे लोकप्रतिनिधी आहेत ते एकनाथ शिंदे यांचे नेतृत्त्व मान्य करतात. कारण शिंदे साहेब हे १८ तास काम करणारे नेते आहेत. कोणत्याही एका नेत्याचे नाव घेता येणार नाही. कारण काही आमदार आणि काही नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. महाराष्ट्राला लवकरच गोड बातमी मिळेल. १४ आमदार आणि ४० ते ४५ नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत, असा दावा राणे यांनी केला आहे.**

### एक एक विकेट पडेल...

चिन्हावरच विधान परिषदेवर निवडून गेले. त्यांना शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींनी मतदान केले. त्यामुळे सचिन अहिर हे शिवसेनेचेच आमदार आहेत. आठवडाभरापूर्वी खासदारांनी षटकार ठोकले आज आमदार अहिर यांनी षटकार ठोकला, असे नमूद करताना यापुढेही चौकार, षटकार सुरुच राहतील आणि त्यांच्यातील एक एक विकेट पडेल, विधानसभा आणि विधानपरिषदेत महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. त्यामुळे येत्या बुधवारी अहिर यांची उपसभापतीपदी निवड होईल. आणि मुंबईपुरता नाही तर महाराष्ट्रात उपसभापती म्हणून न्याय देण्याचे काम करतील.

**– एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

# महावितरणच्या हलगर्जीपणाचे दोन बळी!

## श्रीरामपूरात कंत्राटी वायरमन, वैजापूरात शेतमजूर महिलेचा विजेच्या धक्क्याने मृत्यू



(छाया – भरत थोरात, श्रीरामपूर, दीपक बारकसे, वैजापूर)

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर I वैजापूर :** महावितरणच्या निष्काळजीपणाचा आणि सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटींचा आणखी एक धक्कादायक चेहरा मंगळवारी (३० जून) समोर आला. अवघ्या काही तासांच्या अंतराने राज्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी विजेच्या धक्क्यामुळे दोन निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागले. श्रीरामपूर तालुक्यात बेलापूर सबस्टेशन अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी वायरमन गणेश बाळासाहेब थोरात (२८) यांचा कामावर असतानाच उच्च दाबाच्या वीजप्रवाहाचा धक्का लागून मृत्यू झाला, तर वैजापूर तालुक्यातील इंदिरानगर परिसरात शेतात मजुरी करणाऱ्या कविता संतोष लोधे (३५) यांचा लटकत्या विजेच्या तारेचा स्पर्श झाल्याने जागीच मृत्यू झाला.

दोन्ही घटना वेगवेगळ्या असल्या, तरी त्यामागील समान धागा म्हणजे महावितरणची कथित हलगर्जी, सुरक्षेच्या नियमांचे पालन न होणे आणि निष्काळजी प्रशासन असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

**श्रीरामपूरात ऑपरेटरच्या हलगर्जीचा आरोप**

बेलापूर सबस्टेशन अंतर्गत उक्कलगाव फिडरवर दुरुस्तीचे काम करत असताना कंत्राटी वायरमन गणेश थोरात यांना उच्च दाबाच्या विजेचा जबरदस्त धक्का बसून त्यांचा जागीच मृत्यू झाला. काम सुरू करण्यापूर्वी त्यांनी संबंधित ऑपरेटरकडे कोणता फिडर बंद आहे, याची चौकशी केली होती. मात्र, चालू फिडरबाबत स्पष्ट माहिती न दिल्याने हा भीषण अपघात घडल्याचा आरोप होत आहे.

घटनेनंतर संबंधित ऑपरेटर घटनास्थळावरून निघून गेल्याची माहिती समोर आली असून, कामासाठी आवश्यक असलेली 'परमिट' नोंद गायब केल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, एवढी मोठी दुर्घटना घडूनही अनेक तास वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले नसल्याने संताप आणखी वाढला.

गणेश थोरात गेली ११ वर्षे कंत्राटी वायरमन म्हणून काम करत होते. वर्षभरापूर्वीच त्यांचा विवाह झाला होता. पाच वर्षांपूर्वी भावाचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबाचा एकमेव आधार असलेल्या गणेश यांच्या निधनाने थोरात कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**वैजापूरात लटकत्या तारेने हिरावला कष्टकरी महिलेचा जीव**

दुसरीकडे वैजापूर तालुक्यातील इंदिरानगर येथील कविता लोधे या शेतात पेरणीच्या कामासाठी गेल्या असताना खाली झुकलेल्या विजेच्या तारेचा त्यांच्या डोक्याला स्पर्श झाला **(पान ४ वर)**



# पालखेडला कुजलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला

### पोलीसासमोर व्यक्तीची ओळख पटविणे आवाहन

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील पालखेड येथे मंगळवारी कुजलेल्या अवस्थेतील एक मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. गावालगत असलेल्या पाण्याच्या ओढ्याजवळ हा मृतदेह सापडल्याने अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब असून हाडेही कुजल्यासारखी झाल्यामुळे मृत व्यक्तीची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आवाहन ठरले आहे.

घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्यजीत ताईतवाले यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून वैद्यकीय अधिकारी व न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) तज्ज्ञांना पाचारण करत तपासाची चक्रे फिरवली.

तपासादरम्यान मृतदेहाजवळ एक शर्ट व पँट आढळून आली. मृताची ओळख पटविणे आणि मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी डीएनए नमुने घेण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार हा मृतदेह सुमारे तीन महिन्यांपूर्वीचा असावा. तसेच पाण्याच्या प्रवाहासोबत तो इतर ठिकाणाहून वाहत येऊन येथे अडकला असण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. मात्र हा प्रकार अपघात, आत्महत्या की नियोजित हत्या याबाबत अद्यापही गूढ कायम आहे. डीएनए अहवाल व फॉरेन्सिक तपासानंतर या प्रकरणातील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, पालखेड येथे सापडलेल्या या रहस्यमय मृतदेहामुळे संपूर्ण परिसरात भीती आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले असून, या मृत्यूमागील नेमके सत्य काय हे जाणून घेण्यासाठी सर्वांच्या नजरा आता तपास अहवालाकडे लागल्या आहेत.

# श्रीगोंद्यात मध्यरात्री एलसीबीची धडक...

## मुंढेकरवाडीत तब्बल २९ लाखांचा गुटखा जप्त

### दोन आलिशान कार, लाखोंचा पानमसाला, तंबाखू, रोकड व मोबाईल हस्तगत

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात प्रतिबंधित गुटख्याच्या काळ्या व्यवसायाला मोठे जाळे असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मंगळवारी मध्यरात्री मुंढेकरवाडी येथे धडक कारवाई करत तब्बल २८ लाख ८८ हजार ३३० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू, दोन चारचाकी वाहने, रोकड व मोबाईल जप्त केले. यावेळी पोलिसांनी तिघा जणांना अटक केली असून तिघे जण फरार झाले आहेत. या कारवाईमुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले असून श्रीगोंदा तालुक्यातील अवैध गुटखा रॅकेट पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

अहिल्यानगर एलसीबीला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ३० जून रोजी पहाटे १२.४५ वाजण्याच्या सुमारास मुंढेकरवाडी येथील अमोल रामदास जाधव यांच्या घरासमोर छापा टाकण्यात आला. त्यावेळी आरोपी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेला विमल केसरयुक्त पानमसाला, व्ही-१ सुगंधित तंबाखू आणि आरएमडी पानमसाला वाहनांमध्ये भरत



**रणगाड्याचा पराक्रमी इतिहास**

**तालुक्यात गुटखा माफिया पुन्हा सक्रिय?**

**मुंढेकरवाडीसारख्या ग्रामीण भागात इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटख्याचा साठा आढळल्याने या अवैध व्यवसायात मागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. एवढा मोठा साठा नेमका कुठून आला, तो कोणत्या जिल्ह्यात पुरवठा होणार होता आणि या साखळीतील मुख्य सूत्रधार कोण, याचा तपास आता पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे.**

**कारवाईतील ठळक बाबी**

**मध्यरात्री एलसीबीची धडक कारवाई २८.८८ लाखांचा प्रतिबंधित गुटखा, तंबाखू व वाहने जप्त,तीघांना अटक, तिघे फरार,गुटखा तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा संशय, एलसीबीच्या कारवाईने गुटखा माफियांचे धाबे दणाणले.**

असल्याचे पोलिसांना आढळून आले. कारवाईदरम्यान स्विफ्ट डिझायर (एमएच -०५ डीएस-१७२४) आणि ह्युंडाई अल्काझार (एमएच-४२ बीई-६३१६) या दोन वाहनांमध्ये तसेच घरासमोर ठेवलेल्या पोत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूचा साठा आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळीच दोन्ही वाहने ताब्यात घेतली.या कारवाईत अमोल रामदास जाधव (मुंढेकरवाडी), अनिल रतन कुरुमकर (मुंढेकरवाडी) आणि फरहान रेहमान बेपारी (बुरुडगल्ली, श्रीगोंदा) यांना **(पान ४ वर)**

# आ. हेमंत ओगले यांना महाराष्ट्र विधानसभेच्या 'तालिका अध्यक्ष' पदाचा मान

**भरत थोरात I राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** महाराष्ट्र विधानसभेच्या चालू पावसाळी अधिवेशनादरम्यान श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले यांना 'तालिका अध्यक्ष' म्हणून सभागृहाचे कामकाज पाहण्याची सुवर्णसंधी मिळाली. हा बहुमान केवळ वैयक्तिक नसून श्रीरामपूर-राहुरी मतदारसंघातील जनतेने आपल्यावर दाखवलेल्या अथांग विश्वासाची ही पावती आहे, अशा भावना आमदार हेमंत ओगले यांनी व्यक्त केल्या.

लोकशाहीच्या या सर्वोच्च व्यासपीठावर अत्यंत महत्त्वाची आणि जबाबदारीची भूमिका पार पाडल्यानंतर त्यांनी मतदारसंघ आणि राज्यातील जनतेशी संवाद साधला.या अभिमानास्पद कामगिरीबद्दल बोलताना आमदार ओगले म्हणाले,

तालिका अध्यक्ष म्हणून सभागृहाचे कामकाज चालवण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत गौरवाचा क्षण आहे. ही जबाबदारी पार पाडताना जनतेच्या अपेक्षा, लोकशाही मूल्ये आणि आपल्या समृद्ध संसदीय परंपरांचे भान अधिक दृढ झाले. मतदारसंघातील नागरिकांनी दिलेल्या प्रेम, विश्वास आणि आशीर्वादाच्या बळावरच मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकतो,

आमदार ओगले यांनी मतदारसंघातील जनतेचे आभार मानत भविष्यातील आपल्या कामाचा संकल्पही जाहीर केला. **(पान ४ वर)**

# वेगवान न्याय, कठोर शिक्षा आणि समाजाचे आत्मपरीक्षण !

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर झालेला अमानुष लैंगिक अत्याचार आणि निर्घृण हत्या हा केवळ एक गुन्हा नव्हता; तो संपूर्ण समाजाच्या विवेकाला हादरा देणारा प्रसंग होता. या प्रकरणात अवघ्या सुमारे दोन महिन्यांत तपास, आरोपपत्र, सुनावणी आणि फाशीच्या शिक्षेपर्यंत पोहोचलेली न्यायप्रक्रिया भारतीय न्यायव्यवस्थेसाठी महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. मात्र या निकालाकडे केवळ ''आरोपीला फाशी'' या भावनिक नजरेने पाहणे पुरेसे नाही. या प्रकरणाने न्यायव्यवस्था, पोलीस, प्रशासन आणि समाज या सर्वांसमोर अनेक मूलभूत प्रश्न उभे केले आहेत.

गुन्हा जितका क्रूर होता, तितकीच तपास यंत्रणांची जबाबदारी मोठी होती. या प्रकरणात पोलिसांनी अल्पावधीत वैज्ञानिक पद्धतीने तपास पूर्ण केला. घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही चित्रफीत, फॉरेन्सिक अहवाल, सायबर विश्लेषण, वैद्यकीय पुरावे आणि साक्षीदार यांची सुसंगत साखळी उभी करण्यात यश आले. त्यामुळे आरोपीविरुद्धचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध झाले. अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये तपासातील त्रुटीमुळे आरोपी सुटतात, असा अनुभव वारंवार येतो. नसरापूर प्रकरणाने दाखवून दिले की, सक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या भक्कम तपास हा न्याय मिळविण्याचा सर्वात महत्त्वाचा पाया आहे.

या प्रकरणात विशेष सरकारी वकिलांनी सर्वोच्च न्यायालयातील विविध निर्णयांचा आधार घेत हा गुन्हा ''रेअरेस्ट ऑफ रेअर'' प्रकारात मोडतो, हे न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडले. न्यायालयानेही गुन्ह्यातील क्रूरता, पीडितेचे अल्पवय, तिची असहाय्यता, आरोपीचे वर्तन, त्याचा पूर्व इतिहास आणि समाजावर झालेला परिणाम या सर्व बाबींचा सखोल विचार करून फाशीची शिक्षा सुनावली. म्हणजेच, न्यायालयाने केवळ भावनिक वातावरणाला बळी न पडता, कायदेशीर कसोट्यांवर हा निर्णय दिला.




य निकालाचा सर्वा मोठा संदेश म्हणजे वेगवान न्याय शक्य आहे. अनेकदा बलात्कार, अत्याचार आणि हत्येची प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात पीडित कुटुंब उद्ध्वस्त होते, साक्षीदार कमकुवत होतात आणि समाजाचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढासळतो. नसरापूर प्रकरणात मात्र अल्पावधीत आरोपपत्र, नियमित सुनावणी आणि सातत्यपूर्ण न्यायालयीन कामकाज यामुळे न्यायाची गती वाढू शकते, हे सिद्ध झाले.

तथापि, एक महत्त्वाचा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली असली, तरी भारतीय कायद्यानुसार ही शिक्षा तत्काळ अंमलात येत नाही. उच्च न्यायालयाची पुष्टी, त्यानंतर सर्वोच्च न्यायालयातील अपील, पुनर्विचार, क्युरेटिव्ह याचिका आणि दयेच्या अर्जाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच अंतिम अंमलबजावणी होते. त्यामुळे भावनिक उद्रेक आणि कायदेशीर प्रक्रिया यातील फरक समाजाने समजून घेणे आवश्यक आहे. कायद्याचे राज्य टिकवायचे असेल, तर न्यायाची प्रक्रिया नियमांनुसारच पूर्ण झाली पाहिजे.

या प्रकरणाने आणखी ... वास्तव समोर ...ने. आरोपीचा ...पूर्वीही महिलांवरील ...आणि अल्पवयीन मुलीवरील गंभीर स्वरूपाचा कथित गुन्हेगारी इतिहास न्यायालयासमोर आला. समाज म्हणून आपण ...अशा प्रवृत्तींकडे ...त लक्ष देतो का? ...गुन्ह्यांवर प्रभावी कारवाई झाली असती, तर पुढील भीषण गुन्हा टाळता आला असता का? हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. गुन्हा घडल्यानंतर शिक्षा देणे आवश्यकच; पण गुन्हा घडू न देणे ही त्याहून मोठी जबाबदारी आहे.

बालकांवरील लैंगिक अत्याचार हा केवळ कायद्याचा विषय नाही; तो सामाजिक संस्कारांचा विषय आहे. कुटुंब, शाळा, स्थानिक समाज, प्रशासन आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणा यांनी एकत्रितपणे सुरक्षित वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. मुलांना सुरक्षिततेचे शिक्षण, संशयास्पद वर्तनाची तक्रार करण्याची यंत्रणा, सार्वजनिक ठिकाणांवरील देखरेख आणि गुन्हेगारांवर तातडीची कारवाई याकडे अधिक गांभीर्याने पाहावे लागेल.

नसरापूर प्रकरणात न्यायालयाने तपास अधिकारी, डॉक्टर, फॉरेन्सिक तज्ज्ञ, सायबर तज्ज्ञ आणि विशेष सरकारी वकिलांच्या कार्याचे कौतुक केले. हा निकाल एखाद्या व्यक्तीचा नव्हे, तर समन्वयाने काम करणाऱ्या संपूर्ण यंत्रणेचा परिणाम आहे. ही कार्यपद्धती देशभरातील प्रत्येक जिल्ह्यासाठी आदर्श ठरू शकते.

समाजात अनेकदा ''न्याय मिळत नाही'' अशी भावना व्यक्त केली जाते. नसरापूर प्रकरणाने त्या भावनेला सकारात्मक उत्तर दिले आहे. परंतु प्रत्येक प्रकरणात अशीच गती, अशीच गुणवत्ता आणि अशीच उत्तरदायित्वाची भावना दिसली, तरच या निकालाचे खरे महत्त्व सिद्ध होईल.

नसरापूरची निष्पाप चिमुरडी परत येणार नाही. तिच्या कुटुंबाचे दुःख कधीही भरून निघणार नाही. मात्र तिच्या बलिदानातून देशाने धडा घ्यायला हवा की, गुन्हेगाराला शिक्षा ही अपरिहार्य आहे; पण त्याहून मोठे ध्येय म्हणजे अशा गुन्ह्यांना जन्म देणाऱ्या सामाजिक, प्रशासकीय आणि कायदेशीर उणिवा वेळेत दूर करणे. वेगवान तपास, वैज्ञानिक पुरावे, सक्षम सरकारी पक्ष, संवेदनशील न्यायालय आणि जागरूक समाज यांची सांगड घातली, तरच प्रत्येक बालक सुरक्षित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकेल.

# पशुसंवर्धन खात्याचे रिकामे भूखंड उद्योग उभारणीला द्या व पशु दवाखाने सुरु करा : आ. काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगावात रिकामे पडून असलेले पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे भुखंड उद्योग उभारण्यासाठी द्यावेत. तालुक्यातील जवळके, कुंभारी आणि शिरसगाव या गावात पशु दवाखाने सुरू करावेत. या दोन महत्वाच्या मागण्या आमदार आशुतोष काळे यांनी विधीमंडळाच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान मांडल्या.

> कोपरगाव विधानसभा मतदारसंघात कारण नसताना, तासंतास वीजपूरवठा खंडित होतो. एप्रिल मे महिन्यात मतदारसंघात अवकाळी पावसामुळे विजेचे खांब आणि वीज वाहिन्या कोलमडून पडल्या. शेतक-यांचे आणि पशुपालकांचे हाल होत आहेत. दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी महावितरण कंपनीने कामगारांच्या टोळ्या वाढवाव्या आणि दुरुस्तीच्या कामाला गती द्यावी.
>
> **आ. आशुतोष काळे.**




**विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात बोलतांना आमदार आशुतोष काळे**

ते म्हणाले, कोपरगाव शहरात पशुसंवर्धन विभागाची ८६.४० हेक्टर आणि कॅटल ब्रीडिंग सेंटर फार्मच्या मालकीची १५.१९ हेक्टर अशी एकूण १०१.५९ हेक्टर जमिन पडून आहे. ही जागा उद्योग उभारणीसाठी हस्तांतरित करावी. त्याचा फायदा तालुका व जिल्ह्याला होईल. कोपरगावच्या दोन्ही बाजूने राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्ग गेले आहेत. स्वतंत्र रेल्वे स्टेशन आणि जवळच शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि समृद्धी महामार्ग आहे. या जमिनीवर कृषी, दूध,अन्न प्रक्रिया उद्योग उभारता येतील. याशिवाय मालाच्या साठवणुकीसाठी वेअरहाऊस आणि कोल्ड स्टोरेजची निर्मिती करता येईल.

तालुक्यात ७४ हजार जनावरे आहेत आणि तुलनेत पशु दवाखाने कमी आहेत. जवळके, कुंभारी आणि शिरसगाव या गावात पशु दवाखाने सुरू करण्या बाबतच्या प्रस्तावांना तातडीने मंजूरी मिळावी. संवत्सर ग्रामीण रूग्णालयाचे काम सुरू आहे. तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र कोकमठाण या गावामध्ये स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव मंजूर करावा.

# कापूस उत्पादकता अभियान अंतर्गत शेतकऱ्यांना बियाणांचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील प्रवरा संगम गावातील ९० शेतकऱ्यांना कापूस उत्पादकता अभियान अंतर्गत बियाणांचे वाटप करण्यात आले. सहाय्यक कृषी अधिकारी कीर्ती सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांना कपास कांती अंतर्गत बियाणे वाटप करून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे होते.

मंडल कृषी अधिकारी लक्ष्मणराव सुडके यांनी उच्च घनता लागवड कपाशीची करून उत्पादन वाढवावे यासंदर्भात माहिती दिली दोन ओळीतील अंतर तीन फूट व दोन रोपातील अंतर एक फूट तसेच अर्धा फूट ठेवून लागवड करावी. त्याचप्रमाणे कपाशीची फांद्यांची वाढ म्हणजे कायिक कमी करण्यासाठी चमत्कार ची फवारणी करावी असा सल्ला दिला.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी खात्यामार्फत कापूस पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी यावर्षीच्या हंगामात प्रयत्न केले जाणार आहे. बियाणे वाटप कार्यक्रम प्रसंगी प्रकाश पांडव, नामदेव मते, उल्हास मुळे, रविंद्र फाजगे, शिवाजी पारखे,शिवाजी आगळे,गंगाधर वाघमारे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अशोकला ऊस न देणाऱ्या सभासद शेतकऱ्यांचे मतपरिवर्तन करा : व्हा. चेअरमन झुराळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : अशोक कारखाना हा आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांची कामधेनू आहे. उपस्थित सभासद अशोकला ऊस देणार आहातच. परंतू अशोकला ऊस देणार नाही अशी मानसिकता असलेल्या आपले नातेवाईक मित्रपरिवार यांचे मतपरिवर्तन करा.असे आवाहन अशोकचे नवनिर्वाचित व्हा चेअरमन आदिनाथ झुराळे यांनी मुठेवाडगांव येथील कार्यक्रमात बोलताना केले.

मुठेवाडगांव येथे लोकसेवा मंडळ,ऊस उत्पादक सभासद व कारखाना कामगारांचे वतीने संत तुळशीराम महाराज मंदिर सभामंडपात नवनिर्वाचित व्हा चेअरमन आदिनाथ झुराळे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ कार्यकर्ते संपतराव मुठे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सत्कार समारंभात बोलताना आदिनाथ झुराळे पुढे म्हणाले की, आपल्या श्रीरामपूर तालुक्याचे पूर्व भागात सहकार क्षेत्रात गावोगावच्या कार्यकारी सोसायट्या नंतर सहकारातील फक्त अशोक सहकारी साखर कारखाना हा मोठा प्रकल्प मा.आ.भानुदास मुरकुटे यांच्या अधिपत्याखाली टिकून आहे. तालुक्यातील सहकारातील वैभवशाली अशा खरेदी विक्री संघ,मुळा प्रवरा,सुतगिरणी या संस्था बंद पडल्या.फक्त अशोक सहकारी साखर कारखाना सुरळीत सुरू आहे. या कारखान्यात लोकनेते माजी आ.भानुदास मुरकुटे यांनी आपली व्हा चेअरमनपदी बिनविरोध निवड करून सभासद कामगार यांची सेवा करण्याची संधी दिली. या पदाचे माध्यमातून आपण ऊस उत्पादक सभासद,कारखाना कामगार यांच्या प्रश्नांची प्राधान्याने सोडवणूक करू असे शेवटी झुराळे म्हणाले.याप्रसंगी माजी व्हा चेअरमन बाबासाहेब आदिक , ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष वसंतराव मुठे,पत्रकार भाऊसाहेब काळे यांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी संचालक विरेश गलांडे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबासाहेब गोसावी, अँड दिलीप मुठे, माजी सरपंच भाऊसाहेब मुठे, गणेश भाकरे, दिपक झुराळे, बाबासाहेब मुठे, लक्ष्मणराव मुठे, रामभाऊ महाराज मुठे, लहानु मुठे, मल्हारी मुठे, नामदेव मुठे, जयराम मुठे, सुरेश मुठे, भागवत मुठे, शरद मुठे, विनायक मुठे, राजेंद्र मुठे, भाऊसाहेब आसने,अशोक पवार, सुनील मुठे रावसाहेब मुठे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचलन भिकचंद मुठे यांनी केले तर आभार माजी सरपंच शिवाजी मुठे यांनी मानले.

# महावितरणच्या लेखी आश्वासनानंतर आजचे 'रास्ता रोको' आंदोलन स्थगित

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी परिसरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून भेडसावणाऱ्या वीज पुरवठ्याच्या गंभीर समस्यांवर सकारात्मक चर्चा झाली असून, महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बहुतांश मागण्या मान्य करत लेखी आश्वासन दिल्यानंतर आज बुधवारी (दि. १ जुलै) नियोजित असलेले मांचीहिल फाट्यावरील 'रास्ता रोको' आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. सोमवारी (दि. २९ जून) सायंकाळी मांचीहिल येथे माजी पंचायत समिती सदस्य सरुनाथ उंबरकर आणि महावितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी संगमनेरचे उप कार्यकारी अभियंता मंगेश प्रजापती, जोर्वे विभागाचे सहायक अभियंता ए. आर. मेखे, आश्वी विभागाचे सहायक अभियंता ए. एस. विखे आणि सहायक अभियंता संदीप सोनार यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते किशोर जहाड, ओझर येथील रामभाऊ थोरात, उंबरी बाळापूर येथील अण्णासाहेब सारबंदे, जनार्दन उंबरकर, संतोष उंबरकर, शिवा भुसाळ, बाबासाहेब भुसाळ आदिंसह पंचक्रोशीतील शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी झालेल्या चर्चेवेळी वीज कंपनीने शेतीसाठी दिवसा सहा तास पूर्ण दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी दीड महिन्याची मुदत मागितली असून, वरंवडी येथील सौर ऊर्जा प्रकल्प ते आश्वी सबस्टेशन लाईन कार्यान्वित होताच शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याचबरोबर गावठाण भागाला २४ तास सिंगल फेज अखंडित वीज पुरवठा देण्यासही कंपनीने नैसर्गिक आणि तांत्रिक व देखभाल दुरुस्ती अडचणी वगळता सहमती दर्शवली आहे. तर, जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून बाभळेश्वर ते आश्वी मुख्य लाईन आणि सबस्टेशनसाठी आवश्यक त्या साधन व यंत्र सामुग्रीचा पुरवठा करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करू.

# वाढीव घरपट्टीविरोधात कोपरगावात राष्ट्रवादी काँग्रेस ठाम जुन्याच पद्धतीने कर आकारणी मागणीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना वाढीव दराने घरपट्टी (मालमत्ता कर) आकारण्यात आली आहे. वाढीव कराच्या अधिकृत घरपट्टी पावत्या देखील नागरीकांना देण्यात आल्या आहेत. मात्र या वाढीव घरपट्टी आकारणी बाबत नागरीकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असल्याने हजारो नागरिकांनी वाढीव घरपट्टी विरोधात हरकती नोंदविल्या आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य, मजूर, ज्येष्ठ नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंब आणि अल्प गटातील नागरिकांचे कंबरडे मोडले असून त्यात हि अवाजवी घरपट्टी (मालमत्ता कर) लादने अत्यंत अन्यायकारक असल्याने कोपरगाव शहरात जुन्या पद्धतीनेच घरपट्टी आकारण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




दिलेल्या निवेदनात त्यांनी असे म्हटले आहे की, मालमत्तांचे चुकीचे वर्गीकरण, कर निर्धारणातील त्रुटी, आकारणीतील विसंगती तसेच नागरिकांना पुरेशी माहिती न देता करण्यात आलेली आहे. याच बरोबर केलेली वाढ ही थोडी थोडकी नसून दुप्पट, तिप्पट तर काही ठिकाणी चौपट देखील करण्यात आली असल्याने याबाबत अनेक हरकती व तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. जून महिना संपला असताना देखील पाऊस झालेला नसल्याने बाजारपेठ ही ठप्प आहे. त्याच बरोबर वाढलेली महागाई, आवाक्याबाहेर चाललेला जीवनावश्यक खर्च अशा आर्थिक अडचणींचा सामना करीत असलेल्या कोपरगावच्या नागरिकांवर वाढीव घरपट्टी लादल्यास त्यांच्या आर्थिक अडचणी अधिकच वाढणार असल्याने आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव शहरात २ दिवसांचे धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

# शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यातील दुवा ठरलेले बाभळेश्वरचे कृषी विज्ञान केंद्र

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : ''शेतकरी हा खरा शास्त्रज्ञ असतो.'' आपल्या शेतात वेगवेगळे प्रयोग करत, नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारत आणि प्रतिकूल परिस्थितीतही यशाची नवी वाट निर्माण करत तो शेतीला समृद्ध बनवत असतो. अशाच प्रयोगशील शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहून त्यांना विज्ञानाची जोड देण्याचे काम गेल्या तीन दशकांपासून पायरेन्स संचलित बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्र करत आहे.



सन १९९३ मध्ये पद्मभूषण लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून पायरेन्स संस्थेअंतर्गत बाभळेश्वर येथे कृषी विज्ञान केंद्राची स्थापना झाली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान पोहोचावे, शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर व्हावी आणि शेतकरी आत्मनिर्भर व्हावा, या उद्देशाने सुरू झालेल्या या केंद्राने आज राष्ट्रीय पातळीवर आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून कृषी विज्ञान केंद्राने शेतकरी, महिला, युवक आणि युवती यांना आधुनिक शेतीचे प्रशिक्षण दिले आहे. हवामान बदल, कोरडवाहू शेती, सेंद्रिय व नैसर्गिक शेती, शेळीपालन, कुक्कुटपालन, फळबाग व्यवस्थापन, भाजीपाला उत्पादन, फुलशेती, मृदा व पाणी व्यवस्थापन, प्रक्रिया उद्योग आणि शेतीपूरक व्यवसाय अशा अनेक विषयांवर हजारो शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. केंद्राच्या प्रात्यक्षिक शेतामध्ये एकात्मिक शेतीचे उत्कृष्ट मॉडेल विकसित करण्यात आले असून सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, गहू आणि इतर पिकांवर सातत्याने प्रयोग करून उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाते. आंबा, डाळिंब, केळी, फुलशेती आणि भाजीपाला क्षेत्रातही केंद्राने विशेष कामगिरी केली आहे.

कोविड काळात जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांच्या प्रयत्नातून सुरू करण्यात आलेली 'नक्षत्र परसबाग' संकल्पना महिलांसाठी वरदान ठरली. या उपक्रमामुळे हजारो महिलांना त्यांच्या घरच्या परसबागेत सेंद्रिय आणि ताजा भाजीपाला उपलब्ध झाला. कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेला के व्ही के प्रवरा कम्युनिटी रेडिओ देखील शेतकरी बांधवांसाठी माहिती तंत्रज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे. रेडिओच्या माध्यमातून विविध उपक्रम शेतकऱ्यांच्या विविध यशोगाथा आणि शेतकऱ्यांचे अनुभव हे केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहेत.

बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्राने केवळ तंत्रज्ञान दिले नाही, तर शेतकऱ्यांना संघटित करण्याचे कामही केले. नाबार्डच्या माध्यमातून प्रत्येक गावात फार्मर्स क्लबची स्थापना, शेतकरी गटांची निर्मिती आणि जवळपास ५० ते ६० शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना करून समूहशक्तीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले. आज या कंपन्यांच्या माध्यमातून शेतकरी खते, बियाणे, प्रक्रिया उद्योग आणि विविध सेवा सुविधा सामूहिकपणे उपलब्ध करून घेत आहेत. केंद्राच्या माध्यमातून माती, पाणी आणि देठ परीक्षण प्रयोगशाळा, जैविक खते व जैविक औषधांचे उत्पादन, दर्जेदार रोपवाटिका आणि हवामान आधारित सल्ला सेवा प्रभावीपणे दिली जात आहे. सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून शेतकऱ्यांपर्यंत हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन आणि विविध योजनांची माहिती तत्काळ पोहोचवली जात आहे.

> मंत्री विखे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रम हे केंद्राच्या माध्यमातून सुरू करून शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातील नवीन कौशल्य त्याचबरोबर विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून शेती व्यवसायामध्ये नाविन्यपूर्ण व्यावसायिक दृष्टिकोन राबवण्यावरती कृषी विज्ञान केंद्राचा भर असल्याने आज अनेक कृषी उद्योजक कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून तयार झाले आहेत आणि ते आपल्या प्रगती बरोबरच शेती क्षेत्राच्या प्रगतीलाही हातभार लावत आहेत आज अनेक यशोगाथा हे आज केंद्राच्या आज केंद्राच्या संपर्कातील शेतकऱ्यांच्या अनेक यशोगाथा ह्या राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांना दिशादर्शक ठरत आहे
>
> **–डॉ. उत्तमराव कदम**
> **संचालक कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर**

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, केंद्राचे संचालक डॉ.उत्तमराव कदम आणि सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राने विकासाची नवी उंची गाठली आहे. केंद्राचे प्रमुख शैलेश देशमुख यांच्यासह डॉ. विलास घुले, डॉ. प्रियंका खर्डे, सज्जला लांडगे, डॉ. विठ्ठल विखे आणि कैलास लोंढे यांचे कार्यही शेतकऱ्यांसाठी मोलाचे ठरत आहे.

आज कृषी दिन साजरा होत असताना शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांची योग्य सांगड घालून शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि नफ्याची करण्याची गरज आहे. आणि हेच कार्य बाभळेश्वरचे कृषी विज्ञान केंद्र गेल्या ३३ वर्षांपासून सातत्याने करत आहे. त्यामुळेच बाभळेश्वरचे कृषी विज्ञान केंद्र आज केवळ एक संस्था नसून, शेतकऱ्यांच्या प्रगतीचा आणि ग्रामीण विकासाचा विश्वासार्ह आधारस्तंभ बनले आहे.

# प्रवचन-कीर्तनातून मराठी शाळांविषयी जनजागृती करणार : महेंद्र रहाणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक महेंद्र रहाणे हे मंगळवारी (दि. ३० जून) तब्बल ३६ वर्षांच्या निष्कलंक सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. यानिमित्त शाळेत आयोजित निरोप समारंभात विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी त्यांचा भावपूर्ण सत्कार करून निरोप दिला. सेवानिवृत्तीनंतर समाजप्रबोधनासाठी प्रवचन व कीर्तनाच्या माध्यमातून कार्य करणार असून, मराठी शाळांचे महत्त्व पटवून देण्यासाठी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळांविषयी जनजागृती करण्यासाठी अधिक वेळ देणार असल्याची भावना महेंद्र रहाणे यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. त्यांच्या या घोषणेला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी प्रभारी मुख्याध्यापक विलास गवळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण जावळे, चंद्रविलास गव्हाणे, सुरेश धनगर, अनिल पराड, बजरंग भागवत, कविता पानसरे, राजेंद्र माळी आदी उपस्थित होते. यावेळी चंद्रविलास गव्हाणे, विलास गवळी, अनिल पराड व बजरंग भागवत यांनी मनोगत व्यक्त करताना महेंद्र रहाणे यांनी मुख्याध्यापक म्हणून तीन वर्षांच्या कार्यकाळात प्रामाणिकपणे व विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोनातून उल्लेखनीय काम केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनीही आपल्या लाडक्या मुख्याध्यापकांप्रती असलेले प्रेम आणि आदर व्यक्त करताना भावनिक मनोगते मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रविलास गव्हाणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विलास गवळी यांनी मानले.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## सौर ऊर्जा प्रकल्पाला थ्री-फेज वीजपुरवठ्याचा खोळंबा

**श्रीरामपूर :** पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने अंबिका महिला नागरी पतसंस्थेने ऑगस्ट २०२२ मध्ये आपल्या इमारतीवर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारला. मात्र, गेल्या तीन महिन्यांपासून आवश्यक थ्री-फेज वीजपुरवठा सुरळीत मिळत नसल्याने सोलर यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत राहू शकत नसल्याची तक्रार संस्थेने केली आहे. यामुळे दरमहा हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान होत असून, महावितरणकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. संस्थेने दिलेल्या निवेदनानुसार, वारंवार खंडित होणारा व कमी दाबाचा थ्री-फेज वीजपुरवठा यामुळे सोलर प्रकल्पातून अपेक्षित वीज निर्मिती होत नाही. परिणामी, ग्रीडमध्ये वीजपुरवठा कमी होत असून संस्थेला मोठी वीजबिले भरावी लागत आहेत. याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र, वरिष्ठ स्तरावरूनच कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने समस्या कायम असल्याचे सांगण्यात आले. आवश्यक तांत्रिक उपाययोजना करून संस्थेचे होत असलेले आर्थिक नुकसान थांबवावे, अशी मागणी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणकडे केली आहे.

## लहामगे ३६ वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त, सहकारी संस्था व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



**पुणतांबा :** जिल्हा सहकारी बँक शाखा पुणतांब्याचे शाखाधिकारी रंगनाथ लक्ष्मण लहामगे आपल्या छत्तीस वर्षाच्या सेवेनंतर ३० जून २०२६ रोजी सेवा निवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा विविध सहकारी संस्था व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. लहामगे यांनी जिल्हा सहकारी बँकेत छत्तीस वर्षे अविरत सेवा केली शाखाधिकारी म्हणून निवृत्त होताना पुणतांबा शाखेत त्यांनी काम पाहिले. त्यांचा सेवा निवृत्ती बद्दल बिग बागातदार सोसायटीचे संचालक राजेंद्र थोरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच पुणतांबा नंबर दोन सहकारी संस्थेचे चेअरमन सुधाकर जाधव उपाध्यक्ष अशोक धनवटे यांच्या हस्ते देखील सत्कार करण्यात आला. यावेळी बाळासाहेब जगदाळे, प्रसाद उपाध्ये, रावसाहेब धरम सोसायटी सचिव धनवटे राजेंद्र शिंदे, चांगदेव धनवटे, भरत शेरकर, सोपान गायकवाड आदि ग्रामस्थ तसेच बँकेचे कर्मचारी मीरा जगदाळे अभिषेक गमे, अशोक वायदंडे, गोपाल वहाडणे आधी जण उपस्थित होते.

## नेवासा तालुक्यात पल्स पोलिओ लसीकरण मोहीमेला प्रतिसाद

**नेवासा :** तालुक्यातील सुमारे ३१ हजार ११४ बालकांना तालुक्यात विविध ठिकाणी २०३ बूथ स्थापन करून ही पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली.



लसीकरण मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नेवासा शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्रमध्ये नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या हस्ते पोलिओ लसीकरणाचा शुभारंभ करण्यात आला. आरोग्य खात्याच्यावतीने शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना या पोलिओ लसीकरण मोहिमत सहभागी करुन घेण्यात आले. स्थानिक सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि विशेष सार्वजनिक बूथवर हे लसीकरण मोफत आहे. मुकिंदपूर, कुकाण्यासह तालुक्यातील सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रात ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.

## सत्तेत सहभागी झाल्यामुळे पुणतांबेकरांच्या अपेक्षा उंचावल्या

**पुणतांबा :** शिर्डी लोकसभा मतदारसंघातील खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी केवळ मतदारसंघातील विकासकामे होण्यासाठी उपमुख्यमंत्री व शिवसेनाप्रमुख ना. एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश केल्यामुळे मतदारसंघातील पुणतांबा परिसरातील मतदारांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. सत्तेशिवाय विकास होऊ शकत नाही हे वास्तव आहे. खा. वाकचौरे यांनी काळाची गरज ओळखून निर्णय घेतला आहे. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थ समाधानी आहे. मात्र पक्षांतरामुळे पुणतांबा परिसरातील गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणारे प्रश्न मार्गी लागतील अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे. परिसराला वरदान ठरणाऱ्या पुणतांबा -रोटेगाव रेल्वे मार्गी लावले, पुणतांबा येथे बहुतांशी रेल्वे गाडयांना थांबा मिळवून देणे साईनगर पंढरपूर गाडी सुरू करणे, रेल्वे खात्यामार्फत पुणतांबा येथे छोटा मोठा उद्योग सुरु करणे पुणतांबा -शिर्डी रस्त्याचे चौपदरीकरण करणे सह अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्याची गरज आहे. खा. वाकचौरे सत्तेत नसल्यामुळे मतदारसंघातील कामे झाली नाहीत. आता मात्र विकास कामांना गती देण्याची गरज आहे. परिसरातील प्रलंबित प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी पुणतांबा गावातील ग्रामस्थांचे शिष्टमंडळलवकरच खा. वाकचौरे यांची शिर्डी येथे भेट घेणार असल्याचे समजते.

## संजीवनीचा प्रथमेश गोसावी एमएचटी-सीईटी परीक्षेत ९९.९९ पर्सेन्टाइलसह प्रथम

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) २०२६ मध्ये संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचालित संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या प्रथमेश रवींद्र गोसावी याने ९९.९९ पर्सेन्टाइल गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला,



तर सिद्धेश प्रशांत क्षत्रिय याने ९९.२० पर्सेन्टाइल गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. विशेष म्हणजे, महाविद्यालयातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त पर्सेन्टाइल गुण मिळवत स्पर्धात्मक परीक्षांमधील संजीवनीच्या भक्कम शैक्षणिक तयारीची आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची प्रभावी साक्ष दिली. या परीक्षेत संजीवनीच्या ३६ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेन्टाईल, ६२ विद्यार्थ्यांनी ८५ ते ९० पर्सेन्टाईल व १०० विद्यार्थ्यांनी ८० ते ८५ पर्सेन्टाईल गुण मिळवुन आपली गुणवत्ता सिध्द केली. एमएचटी-सीईटी ही परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षणालयाच्या अधिपत्याखाली राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा मार्फत राज्यातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाते. महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) २०२६ मध्ये संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत ग्रामीण भागातील शिक्षणसंस्थाही गुणवत्तेच्या बळावर राज्याच्या शैक्षणिक नकाशावर आपला ठसा उमटवू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# विधानसभेत विविध प्रश्नांवर आ. खताळ आक्रमक!

## सिड हल्ला, आरोग्य, वीज, महिला सुरक्षा प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले



यावे,
फळबाग

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर विधानसभा मतदारसंघा तील विविध लोकहिताच्या प्रश्नांवर आमदार अमोल खताळ यांनी विधान सभेच्या पावसाळी अधिवेशना मध्ये वडगावपान शाळकरी मुलीवरील ऍसिड हल्ला, चंदनापुरी धांदरफळ खुर्द व तळेगाव येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करावे, शेतकऱ्यांना आठ तास वीजपुरवठा मिळत नाही तसेच महिला आयोगाला अध्यक्ष नसल्या मुळे त्याची तातडीने नेमणूक करावी या प्रमुख प्रश्नांवर आ. अमोल खताळ यांनी विधानसभेत आवाज उठवत राज्य सरकारचे या प्रमुख प्रश्नांकडे लक्ष वेधले.

महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित मुद्दा उपस्थित करताना राज्य महिला आयोगाला गेली चार महिन्यांपासून अध्यक्ष नसल्याने महिलांशी संबंधित कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीत अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे महिला आयोगावर तातडीने अध्यक्षांची नियुक्ती करावी, अशी मागणीही आ. अमोल खताळ यांनी विधानसभेत करत या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधले.

संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे अल्पवयीन मुलीवर झालेल्या सिड हल्ल्याच्या घटनेला तीन ते चार महिने उलटूनही या घटनेतील हल्लेखोर अद्याप पोलिसांना सापडू शकत नाही याबद्दल आ. खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रकरणातील तपासाला अपेक्षित गती मिळालेली नसून महिला आणि बाल विकास विभागाकडूनही प्रभावीपणे पाठपुरावा होत नसल्याचा आरोप त्यांनी विधानसभेत केला.

संगमनेर विधानसभा मतदारसंघा तील चंदनापुरी, धांदरफळ खुर्द आणि तळेगाव दिघे येथे ग्रामीण रुग्णालये मंजूर करावीत, अशी मागणी त्यांनी केली.तसेच घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पीईटी स्कॅनची सुविधा उपलब्ध करून द्यावी आणि संगमनेर येथे ट्रॉमा सेंटर सुरू करावे, अशीही मागणी त्यांनी शासनाकडे केली.

राज्यात बेकायदेशीर गर्भलिंग निदानाविरोधात तक्रारी नोंदविण्यासाठी सुरू करण्यात आलेला हेल्प लाइन क्रमांक सध्या बंद असल्याचे सांगत तो तातडीने पुन्हा सुरू करावा आणि त्याच्या प्रभावी नियंत्रणाची जबाबदारी शासनाने घ्यावी.तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते; मात्र नगरपंचायत व नगर परिषद क्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांचाही या कार्यक्रमात समावेश करावा, अशी मागणी त्यांनी केली तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत गेल्या दहा वर्षांपासून कार्यरत कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे किंवा त्यांच्या वेतनात वाढ करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना राज्य सरकारने कर्जमाफीबाबत घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयाचे त्यांनी स्वागत केले. मात्र, सरकारने जाहीर केलेल्या आठ तासांच्या वीजपुरवठ्याचा लाभ अनेक भागांतील शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.याशिवाय संगमनेर येथे शेतकरी भवन उभारण्यात अनुदानाची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी व कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाचे स्वतंत्र केंद्र संगमनेर येथे सुरू करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

# ३३ टक्के नुकसानभरपाईच्या अटीचा पुनर्विचार करा

## विधानसभेत आ. विवेक कोल्हे यांची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी लागू असलेल्या ३३ टक्के पीक नुकसानीच्या अटीचा पुनर्विचार करून हा विषय तज्ज्ञ समितीकडे सोपवावा, तसेच पंचनामा प्रक्रिया अधिक पारदर्शक व अचूक करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन सर्वेक्षण, उपग्रह प्रतिमा आणि मोबाईल-आधारित जिओ-टॅगिंग तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करावा, अशी मागणी आमदार विवेक कोल्हे यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात केली.



कोपरगाव मतदारसंघातील अतिवृष्टीमुळे पॉलिहाऊसचे नुकसान झालेले प्रगतशील शेतकरी अशोक दशरथ भाकरे यांच्यासह राज्यातील सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित करत त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. नैसर्गिक आपत्तीनंतर होणाऱ्या पंचनाम्यांवर अनेक ठिकाणी वाद निर्माण होत असल्याने आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्वेक्षण केल्यास पारदर्शकता वाढेल आणि शेतकऱ्यांचा विश्वास दृढ होईल, असे त्यांनी सांगितले.

पिक विमा कंपन्यांकडून दाव्यांच्या निकाली होणाऱ्या विलंबामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे नमूद करत, विमा दावे निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवून डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली लागू करण्याची मागणीही त्यांनी केली.

एनडीआरएफच्या विद्यमान निकषांमध्ये पॉलिहाऊस व शेडनेटचा समावेश नसल्याने अशा संरचनांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळत नसल्याचे आ. कोल्हे यांनी निदर्शनास आणून दिले. अशा शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करण्याचीही त्यांनी मागणी केली.

यावर उत्तर देताना मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले की, एनडीआरएफचे नवीन निकष लवकरच लागू होणार असून त्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. नवीन निकष लागू झाल्यानंतर पॉलिहाऊस व तत्सम संरचनांच्या नुकसानीचाही विचार केला जाईल आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शिर्डीत आज साखर कामगार समन्वय समितीची आढावा बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** महाराष्ट्रातील साखर कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्याबरोबरच आगामी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या विषयांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य साखर कामगार समन्वय समितीची बैठक बुधवारी (१ जुलै) सकाळी १० वाजता शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत साखर उद्योगातील कामगारांच्या विविध मागण्या, संघटनात्मक प्रश्न, तसेच पुढील आंदोलनाची दिशा आणि अधिवेशनाच्या तयारीबाबत सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक पवार व सरचिटणीस डी. एम. निमसे यांनी दिली. बैठकीस महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, सरचिटणीस राऊ शंकर पाटील, कार्याध्यक्ष अविनाश आपटे, कोषाध्यक्ष प्रदीप बनगे, तसेच महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष शिवाजीराव औटी आणि उपाध्यक्ष शिवाजी कोठवळ उपस्थित राहणार आहेत. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातील समन्वय समितीचे पदाधिकारी, विविध साखर कारखान्यांतील कामगार संघटनांचे पदाधिकारी व कामगार कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. बैठकीस सर्व संबंधितांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे उपाध्यक्ष डी. एम. निमसे यांनी केले आहे.

## ज्ञानेश्वर कारखाना अध्यक्षपदी नरेंद्र घुले तर काकासाहेब नरवडे उपाध्यक्षपदी बिनविरोध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना अध्यक्षपदी माजी आमदार नरेंद्र मारुतराव घुले तर उपाध्यक्ष पदी सुधाकर उर्फ काकासाहेब नारायणराव नरवडे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाच्या २१ जागांची निवडणूक माजी आ. नरेंद्र घुले व माजी आ. चंद्रशेखर घुले यांच्या नेतृत्वाखाली दि.१८ जून रोजी बिनविरोध झाली होती.



अध्यक्ष-उपाध्यक्ष पदाचे निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांचे अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित संचालकांची सभा मंगळवार दि.३० जून रोजी कारखाना अतिथीगृहात संपन्न झाली. अध्यक्षपदासाठी माजी आमदार नरेंद्र मारुतराव घुले व उपाध्यक्ष पदासाठी सुधाकर नारायणराव नरवडे यांचे ही निवड बिनविरोध झाली.

यावेळी कारखान्याचे संचालक चंद्रशेखर घुले, पांडुरंग अभंग, राज्य साखर कामगार फेडरेशनचे सरचिटणीस नितीन पवार, संचालक पंडितराव भोसले, डॉ.नारायण म्हस्के, जनार्धन कदम, अशोक मिसाळ, मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे,संतोष पावसे, जनार्दन शेळके,दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे,रामनाथ राजपुरे,गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, सुमनबाई काळे, रंजना तानवडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी देविदास घोडेचोर, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे,सरव्यवस्थापक रविंद्र मोटे,कामगार संचालक सुखदेव फुलारी उपस्थित होते.

## एस.टी. आगाराचे वरिष्ठ सहायक वासुदेव आव्हाड प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** एस टी आगाराचे आस्थापना विभागाचे वरिष्ठ सहायक वासुदेव भगवान आव्हाड हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.यावेळी एस टी कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचा गौरव सत्काराद्वारे करण्यात आला.एस टी च्या उत्कर्षासाठी वासुदेव आव्हाड यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन उयोजक व शिवसेना नेते रामदासजी गोल्हार यांनी यावेळी बोलतांना केले. सेवापूर्ती निमित्ताने नेवासा आगारात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक प्रशांत होले हे होते तर हभप विष्णुदास महाराज सांगळे, उद्योजक रामदास गोल्हार, भिवाजी आघाव, प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष अनिलराव ताके, बस स्थानक




प्रमुख ज्ञानेश्वर मुरदारे, कामगार नेते अशोक क्षीरसागर, भाऊसाहेब आव्हाड,मजले चिंचोलीचे सरपंच अमित आव्हाड,प्रवाशी संघटनेचे सचिव पत्रकार सुधीर चव्हाण, संपतराव कर्डीले,दत्तात्रय कोकणे,रमेश दाणे, कामगार नेते अनिल टाके प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी एस टी कामगार संघटनेसह प्रवाशी संघटना, अधिकारी व मित्र परिवार व नातेवाईक मंडळींच्या वतीने वासुदेव आव्हाड व सुनीता आव्हाड यांचा सेवापूर्ती निमित्ताने सपत्नीक गौरव रामदास गोल्हार,आगार व्यवस्थापक प्रशांत होले,अनिल ताके पाटील यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊलींची व विठ्ठल रुख्मिणीची प्रतिमा देऊन करण्यात आला.आपली म्हणून व एस टीचे हित डोळ्यासमोर ठेऊन कर्मचाऱ्यांनी एस टी ची सेवा करावी असे आवाहन वासुदेव आव्हाड यांनी यावेळी बोलतांना केले.

## आरोग्यदायी जीवनशैलीची दिशा देणारे 'लाईफस्टाईल वेलनेस सेंटर': आ. जगताप

**अहिल्यानगर :** आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमध्ये नागरिकांकडून आरोग्याकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत असून त्यामुळे विविध आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. बदलती जीवनशैली, चुकीचा आहार आणि व्यायामाचा अभाव यामुळे अनेक नवनवीन आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि योग्य आरोग्य मार्गदर्शन हा निरोगी जीवनाचा एकमेव प्रभावी मार्ग आहे. 'लाईफस्टाईल वेलनेस सेंटर' च्या माध्यमातून नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीबाबत योग्य मार्गदर्शन मिळणार असून त्यातून प्रत्येकाचे आरोग्य सुदृढ, निरोगी आणि आनंदी राहण्यास मोठी मदत होईल, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

# मठाचीवाडीत दहा लाखांची धाडसी घरफोडी

## सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** तालुक्यातील मठाचीवाडी येथे अज्ञात चोरट्याने मध्यरात्री घरात प्रवेश करून कपाटातील सुमारे साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि. ३०) पहाटे उघडकीस आली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मठाचीवाडी येथील संदिप एकनाथ ठोंबळ हे सोमवारी दिवसभर शेतातील काम करून सायंकाळी घरी आले होते. मंगळवारी पहाटेच्या सुमारास मुलगी पायल हिला जाग आल्यानंतर घरातील लोखंडी कपाट उघडे असल्याचे दिसून आले. तिने वडिलांना उठविल्यानंतर कपाटातील सामानाची उचकापाचक झालेली दिसली. कपाटाची चावी दिवाणावरील गादीवर पडलेली होती. तपासणी केली असता कपाटातील साडेतीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण (साखळीसह सोन्याचे पदक असलेले), सात ग्रॅम वजनाचे मनी मंगळसूत्र, दोन कानातील वेल, सोन्याची अंगठी, सोन्याचे डोरले असे अठरा ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत ७ लाख ५५ हजाराची रोख रक्कम दीड लाख रुपयेचोरीस गेल्याचे निदर्शनास आले. तसेच पॅन्टच्या खिशात ठेवलेली रोख रक्कमही लंपास केली. या प्रकरणी संदिप ठोंबळ यांनी शेवगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेवगावचे पो.नि.मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. कॉ. परशुराम नाकाडे करीत आहे.

# जर्मनीत वेदांत वाघमारेची नेत्रदीपक कामगिरी

## ५० व्या पदकांसह देशाचा वाढविला गौरव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** जर्मनी येथे १६ ते २७ जून २०२६ या कालावधीत पार पडलेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेत नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील आंतरराष्ट्रीय नेमबाज वेदांत नितीन वाघमारे याने ५० मीटर ३ पोझिशन रायफल शूटिंग या प्रकारात सांघिक कांस्यपदक जिंकून भारतासह महाराष्ट्र आणि त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचा गौरव वाढविला आहे.

विशेष म्हणजे, या यशासह वेदांतने आपल्या अवघ्या सात वर्षांच्या नेमबाजी कारकिर्दीत ५० वे पदक जिंकण्याचा ऐतिहासिक



टप्पा गाठला आहे. आतापर्यंत त्याने ९ आंतरराष्ट्रीय, २५ राष्ट्रीय आणि १६ राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये एकूण ५० पदके जिंकून सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे. त्याची जिद्द, अथक परिश्रम आणि खेळाप्रती असलेले समर्पण यामुळे तो देशातील उदयोन्मुख नेमबाजांपैकी एक म्हणून ओळख निर्माण करत आहे.

या यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई घाडगे, उपाध्यक्ष ड. स्नेहल चव्हाण, सहसचिव डॉ. श्रुती आमले, कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले, विश्वस्त चेतन चव्हाण, समन्वयक डॉ.अनुराधा गोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चांगदेव आरसुळे,उपप्राचार्य बर्गे निकिता,प्रा.संतोष जावळे, प्रा.गोरख गुंड, प्रा.सोमनाथ खेडकर, प्रा.अक्षय देवतरसे, प्रा.योगिता गायकवाड, प्रा. अश्विनी औटी, प्रा.भाग्यश्री कोल्हे, प्रा.पल्हारे, प्रा.राहुल बोरुडे, प्रा.प्रविण आवारे, प्रा.मंगेश वैरागर तसेच शिक्षक वाघमारे नितीन, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी वेदांतचे अभिनंदन करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

वेदांतला आंतरराष्ट्रीय रायफल शूटिंग प्रशिक्षक छबुराव काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असून, त्याच्या यशामागे प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित सराव आणि कठोर मेहनत हेच प्रमुख आधार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.


**राहुरी नगरपरिषद राहुरी ता. राहुरी. अहिल्यानगर**
पाणी पुरवठा विभाग

जा.क्र. कावी १०/पा.पु./११३/२०२६ — दिनांक ३०/०६/२०२६.

**बी-१ निविदा / दरपत्रक सुचना**

मा. मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद यांचेकडुन नगरपरिषद निधी अंतर्गत करावयाच्या खालील कामाचे दरपत्रक /निविदा द्विलिफाफा पद्धतीने (बी-१ निविदा) सक्षम प्राधिकरणाकडे योग्य त्या वर्गात नोंद असलेल्या नोंदणीकृत व अनुभवी संस्था / मक्तेदार तसेच ई.पी.एफ परवाना धारक यांचेकडुन मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय बयाना | बयाना रक्कम | निविदा फॉर्म फी १८% GST | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | राहुरी नगरपरिषद मुळा धरण पंप हाऊस येथील मीटरचे Calibration करणे. | दरपत्रक | ५००/- | १००/- | ०१ महीने |
| २. | राहुरी नगरपरिषदेचे ५०, ५२, ४० HP क्षमतेचे सबमर्सिबल पंप दुरुस्त करणे. | दरपत्रक | १०००/- | ३००/- | ०१ महीने |

**नियम व अटी -**
१) कोरे निविदा नमुने विक्री दिनांक ०१/०७/२०२६ ते दिनांक ०७/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत रोख किंमतीस विकत मिळतील. मोहरबंद निविदा दिनांक ०८/०७/२०२६ रोजी सायं ०५.०० वा पर्यंत स्विकारल्या जातील. प्राप्त निविदा दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सायं ०५.०० वा. संबंधीत मक्तेदार/प्रतिनिधी यांचे समक्ष मा. मुख्याधिकारी यांचे दालनात अथवा मे. सभेत उघडल्या जातील.
२) निविदा इसारा रक्कम रोख स्वरुपात भरावी लागेल.
३) इतर सविस्तर अटी व शर्ती पा.पु. विभाग राहुरी नगरपरिषद येथे पहावयास मिळतील.

शिक्का

सही/-
(अभिजीत हराळे)
मुख्याधिकारी
राहुरी नगरपरिषद, राहुरी

## पान १ वरुन

# महावितरणच्या हलगर्जीपणाचे दोन बळी!

आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. कविता लोधे आणि त्यांचे पती मजुरी करून संसार चालवत होते. दोन लहान मुलांचे शिक्षण आणि भविष्य घडवण्यासाठी दोघेही कष्ट करत होते. मात्र एका क्षणात आईचा आधार कायमचा हरपल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. नागरिकांनी महावितरणवर निष्काळजीपणाचा आरोप करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. मात्र महावितरणने जेसीबीच्या खोदकामामुळे वीजखांबाचा आधार सैल झाल्याने तार खाली झुकल्याचा दावा करत संबंधित जेसीबी चालकावर कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. महावितरणकडून दरवर्षी सुरक्षेवर मोठा खर्च आणि जनजागृतीचे दावे केले जातात. मात्र प्रत्यक्षात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेकडे होणारे दुर्लक्ष आणि देखभालीअभावी सर्वसामान्य नागरिकांचे जीव जाण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. श्रीरामपूर आणि वैजापूर येथील या दोन दुर्घटना केवळ अपघात नसून, प्रणालीतील निष्काळजीपणाचा गंभीर इशारा आहेत. या दोन्ही प्रकरणांत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली, तरच भविष्यात अशा दुर्घटनांना आळा बसू शकतो; अन्यथा निष्पाप जीवांचा हा बळी सुरूच राहील. सुरक्षेचे नियम फक्त कागदावरच? श्रीरामपूरातील अपघातात लाईन बंद असल्याची खात्री करण्यासाठी आवश्यक असलेली 'परमिट' प्रक्रिया प्रश्नांकित झाली आहे. तर वैजापूरात लटकत्या विजेच्या तारा वेळेत दुरुस्त न झाल्याने एका महिलेचा जीव गेला. दोन्ही घटनांमुळे महावितरणच्या सुरक्षा तपासण्या, देखभाल व्यवस्था, पर्यवेक्षण आणि जबाबदारीच्या पद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संतप्त नागरिकांचे सवाल... – एका दिवसात दोन निष्पाप जीव गेल्यानंतर जबाबदार कोण? – कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कुणाची? – लटकत्या वीजतारा वेळेत दुरुस्त का करण्यात आल्या नाहीत? – अपघातानंतरच प्रशासन का जागे होते? – दोषींवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल होणार का? परमिट गायब केल्याचा संशय? बेलापूर सबस्टेशनवरील धक्कादायक प्रकार समोर आला असून परमिटची नोंद गायब केल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे संतप्त उक्कलगाव ग्रामस्थ आणखी आक्रमक झाले होते.

# ठाकरेंचे कट्टर सचिन अहिर शिंदेंच्या शिवसेनेत!

अहिर हे ठाकरे कुटुंबाचे निकटवर्तीय बनले होते. आदित्य ठाकरेंसोबत सतत त्यांचा वावर होता दरम्यान अगोदर सहा खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर आता ऑपरेशन टायगर २.० मध्ये सचिन अहिर यांनीही ठाकरेंची साथ सोडली आहे. या सर्व घडामोडी घडत असतानाच आता तिसऱ्या आणि चौथ्या ऑपरेशन टायगरची चर्चा होत आहे. भविष्यात आणखी काही आमदार शिंदे यांच्या पक्षात दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसा दावा शिंदे यांच्या एका आम दाराने केला आहे.निलेश राणे म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी वेळ दिल्यानंतर ऑपरेशन तीन आणि ऑपरेशन चारची सुरुवात होईल असे राणे म्हणाले .तर वरळीत खरी ताकद सुनील शिंदे यांची आहे. पण सचिन अहिर यांना मातोश्रीने जास्त जवळ केलं होतं. आमच्या पण वरिष्ठांनी आत्मपरिक्षण केलं पाहिजे. त्यांचं ज्या पद्धतीने चाललं होतं, ते माझ्या लक्षात येत होतं. पण मी छोटा कार्यकर्ता असल्याने भाष्य केलं नाही सचिन अहिर यांच्या जाण्याने पक्ष म्हणून नुकसान झाल असं वाटत नाही. मी १८ वर्ष वरळीत शिवसेनेचा शाखाप्रमुख होतो. पाच वर्ष नगरसेवक होतो. त्यानंतर सचिन अहिर यांचा पराभव करुन आमदार म्हणून निवडून आलो. आदित्य ठाकरे यांचा सहकारी म्हणून दोन निवडणुकीत त्यांच्यासोबत होतो असं सुनील शिंदे यांनी सांगितलं. वरळी शिवसेनेची आहे. ती व्यक्तीची होऊ शकत नाही. शिवसेनेची सामुदायिक ताकद आहे. अनेक शिवसैनिकांमध्ये धमक आहे. असे कोण आले, गेले मला काही विशेष वाटत नाही अशी प्रतिक्रिया सुनील शिंदे यांनी दिली. शिवसैनिक म्हणून आम्ही वरळीत आमचं काम करत राहू. वरळीतील शिवसेनेचं काम करत राहू असं सुनील शिंदे म्हणाले. ठाकरेंनी आत्मचिंतन केलं पाहिजे का? यावर ते म्हणाले की, . मला पक्ष प्रमुखांबद्दल आदर आहे त्याच्याबद्दल मी असं बोलणार नाही. मी आमच्या काही लोकांबद्दल म्हटलं, त्यांनी आत्मपरीक्षण केलं पाहिजे कोणाला किती महत्व द्यायचं ठाकरे कुटुंबाबद्दल मला आदर आहे, श्रद्धा आहे, त्यांच्याबद्दल वेडवाकडं बोलणार नाही. हे मीडियाच्या माध्यमातून मोठे झालेले लोक आहेत. तिथला शिवसैनिक स्थिर आहे. येणारी कुठलीही निवडणूक असो उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना यशस्वी होईल असा विश्वास सुनील शिंदे यांनी व्यक्त केला. दरम्यान, आम्ही चार किरणांचीही आस का धरावी? जे कधीच नव्हते आमचे त्याची वाट का पहावी? अशा चार ओळी खा. संजय राऊतांनी शेअर केल्या आहेत. पक्षात येतानाच जे स्वार्थ आणि बेईमानीचा कीडा घेऊन येतात त्यांच्या जाण्याचे दुःख का करावे अशी विखारी टीका संजय राऊत यांनी केली. त्यांनी अहिर गेल्याने जणू काहीच फरक पडत नाही असा इशारा खा संजय राऊत यांनी दिला आहे .

# श्रीगोंद्यात मध्यरात्री एलसीबीची धडक...

अटक करण्यात आली. तर दीपक लोखंडे, शोएब राजू तांबोळी आणि 'अफू' (पूर्ण नाव अज्ञात) हे आरोपी फरार झाले असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत. तसेच माजीद नावाच्या व्यक्तीचाही तपास सुरू आहे.यामध्ये पोलिसांनी ८० पोती प्रतिबंधित विमल केसरयुक्त पानमसाला,८० पोती व्ही-१ सुगंधित तंबाखू,२४० पुडे आरएमडी पानमसाला,दोन चारचाकी वाहने,आरोपींकडील रोख रक्कम,विवो आणि ओप्पो कंपनीचे मोबाईल फोन असा एकूण २८,८८,३३० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम ५९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पो. कॉ. मनोज मोहन साखरे यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे करीत आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्या पथकाने केली.

## आ. हेमंत ओगले यांना महाराष्ट्र विधानसभेच्या 'तालिका अध्यक्ष' पदाचा मान

जनतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत, लोकशाहीच्या मूल्यांचे जतन करण्यासाठी आणि मतदारसंघाच्या विकासाभिमुख विचारांना अधिक बळ देण्यासाठी भविष्यातही मी तितक्याच समर्पणाने आणि ताकदीने कार्यरत राहीन, असा विश्वास त्यांनी या वेळी दिला.

आमदार हेमंत ओगले यांना विधानसभेसारख्या सर्वोच्च सभागृहात मिळालेल्या या मानाच्या स्थानामुळे श्रीरामपूर आणि राहुरी मतदारसंघातील नागरिक, कार्यकर्ते आणि चाहत्यांमध्ये प्रचंड आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ऊमरावती विकास सोसायटीची बँक पातळीवर शंभर टक्के वसुली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव :** तालुक्यातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळख असलेल्या ऊमरावती विकास सोसायटीची चालू आर्थिक वर्षात १००% बँक पातळीवर वसुली झाली असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक सहकार महर्षी शंकररावजी कोल्हे कारखान्याचे माजी उपाध्यक्ष अरुणराव येवले यांनी दिली. चालू आर्थिक वर्षात सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी होण्याचा निर्णय घेतलेला होता. मात्र त्याचे निकष खूप होते. या सर्व निकषात आपण बसणार किंवा नाही हे बघण्यापेक्षा देर्डे कोऱ्हाळे येथील सभासद शेतकऱ्यांनी ऊमरावती विकास सोसायटीची बँक पातळीवर शंभर टक्के वसुली करत एक नवा आदर्श निर्माण केला असल्याचेही त्यांनी सांगितले. संस्थेने अडीच कोटी रुपये कर्ज वाटप केले आहे यात सन २०२५ /२६ या आर्थिक वसुली वर्षात अल्पमुदत, मध्य मुदत, दीर्घ मुदत अशी एकूण १ कोटी ५० लाख कर्ज वसुलास पात्र होते. कर्जमाफीचे वारे सुरू असताना देखील सभासदांनी १००% वसूल दिला असल्याने संस्थेची मान डौलाने उंचावली आहे. संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे व आ. विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा विकासाचा आलेख दिवसेंदिवस वाढत चालला आहे. परिसरातील एक नामवंत सहकारी संस्था म्हणून या संस्थेने ओळख निर्माण केली आहे. संस्थेचे संस्थापक अरुणराव येवले, अध्यक्ष देवराम गवळी, उपाध्यक्ष साहेबराव शिंदे व सर्व संचालक मंडळ , तालुका विकास अधिकारी श्री लोहोकरे, संस्थेचे सचिव अशोक घेर, शाखा अधिकारी सुनील दवंगे यांनी या वसुली कमी विशेष परिश्रम घेतले. शंभर टक्के वसूल दिल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष देवराम गवळी यांनी सर्वांचे आभार मानले.

# मुक्त, निष्पक्ष व पारदर्शक 'एसआयआर' मोहिमेचा निर्धार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम-२०२६ प्रभावी, मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्यासाठी श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असून, या मोहिमेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा प्रांताधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत पाटील यांनी दिला.

पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, मतदारसंघात एकूण ३ लाख ५ हजार ४९७ मतदार असून त्यात १ लाख ५३ हजार २४२ पुरुष, १ लाख ५२ हजार १९४ महिला आणि ६१ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. मतदार पडताळणीसाठी ३११ मतदान केंद्रांवर बीएलओ



नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी ३१ क्षेत्रीय पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.३० जूनपासून घराघरांत जाऊन मतदार पडताळणी सुरू करण्यात आली असून बीएलओंना अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामपंचायत व नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी 'मतदार मदत कक्ष' आणि 'बीएलओ मदत कक्ष' सुरू करण्यात आले असून डेटा एन्ट्रीसाठी स्वतंत्र तज्ज्ञ पथक कार्यरत आहे. मोहिमेच्या पारदर्शकतेसाठी विविध राजकीय पक्षांच्या बूथ लेव्हल एजंटची नियुक्ती करण्यात आली आहे. कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, तसेच सर्वेक्षणात अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असे सावंत पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, गटविकास अधिकारी स्मिता निकाळजे, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे व ऋषिशेश पाटील उपस्थित होते. त्यांनी नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक कागदपत्रांसह बीएलओंना सहकार्य करून मतदार यादी अचूक व अद्ययावत करण्याच्या या लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

# दलितांसाठी स्वतंत्र स्मशानभूमीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील घोरपडवाडी येथे दलित समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी आरक्षित करून तिची महसूल व ग्रामपंचायत दप्तरी नोंद करावी, तसेच स्मशानभूमीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून मूलभूत सुविधा उभाराव्यात, अशी मागणी दलित समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ग्रामसेवक, सरपंच व उपसरपंच, ग्रामपंचायत घोरपडवाडी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गावातील दलित वस्तीतील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यास गट क्रमांक १० मधील क्षेत्र १८ हेक्टर १३ आर असलेल्या शासकीय गायरान जमिनीवर अंत्यसंस्कार केले जातात. मात्र संबंधित जागेची अधिकृत



स्मशानभूमी म्हणून दप्तरी नोंद नसल्याने अनेक वेळा अंत्यविधी करताना अडथळे निर्माण होतात. त्यामुळे मृत व्यक्तीच्या नातेवाईकांची हेळसांड होत असून दलित समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच संबंधित गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने अंत्यविधीसाठी आवश्यक जागा उपलब्ध होत नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे वरील गट क्रमांक मधील ४० आर क्षेत्र दलित समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमी म्हणून आरक्षित करून त्याची तातडीने नोंद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय स्मशानभूमीच्या विकासासाठी आर्थिक तरतूद करून संरक्षण भिंत (कंपाऊंड वॉल), अंतर्गत रस्ता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत सुविधा व इतर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. मागण्यांवर १५ दिवसांच्या आत सकारात्मक निर्णय न झाल्यास दलित समाजाच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर महेश पवार, रोहित गायकवाड, काशिनाथ पवार, सुमन पवार, गणेश साळवे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कर्तव्यात कसूर करणाऱ्या तालुका क्रीडा अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** गंगापूर तालुका क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई हे मुख्यालयी राहत नसून कर्तव्यातही कसूर करीत असल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे सचिव डॉ. आबासाहेब शिरसाठ व गंगापूर नगर परिषदेच्या नगरसेविका पल्लवी आबासाहेब शिरसाठ यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद अध्यक्ष तसेच आमदार व तालुका क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष प्रशांत बंब यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बाजीराव देसाई यांची १ नोव्हेंबर २०२२ रोजी गंगापूर येथे पूर्णवेळ तालुका क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. मात्र त्यांना प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यामचाही अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून, त्यामुळे ते गंगापूर मुख्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आठवड्यात किमान दोन दिवस तरी त्यांनी तालुका क्रीडा कार्यालयात पूर्णवेळ उपस्थित राहणे अपेक्षित असताना, गेल्या चार वर्षांत ते मोजक्याच वेळा कार्यालयात आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

यामुळे तालुक्यातील खेळाडू, क्रीडा संघटना व शाळांना आवश्यक मार्गदर्शन मिळत नसून, क्रीडा संकुलातील व्यायामशाळा, इनडोअर हॉल व अन्य सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. शासनाकडून क्रीडा संकुलाच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यासंदर्भात विचारणा केल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला असून, मुख्यालयी न राहणाऱ्या व कर्तव्यात कसूर करणाऱ्या तालुका क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांच्याविरोधात चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# बाराबाभळीत विजेच्या धक्क्याने दोन म्हशींचा मृत्यू

## निष्काळजीपणाप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** भिंगार जवळील बाराबाभळी शिवारात एका शेतात विजेचा तीव्र धक्का लागून दोन दुभत्या म्हशींचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे दूध व्यावसायिक शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यामध्ये दोघा जणांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, फिर्यादी निलेश सतीश आहेरगवळी (वय ४० वर्षे, रा. बाराबाभळी, ता. जि. अहिल्यानगर) हे दूध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवार, २९ जून रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास त्यांच्या म्हशी बाराबाभळी शिवारातील म्हशानखाणीच्या परिसरात नेहमीप्रमाणे चरत होत्या. याच परिसरात सार्वजनिक हायमॅक्स विजेचा खांब आहे. या गावातील रहिवासी आरोपी अशोक कराळे आणि आबा कराळे या दोघांनी मिळून सार्वजनिक विजेच्या खांबावरून अनधिकृतपणे विजेचा आकडा टाकला होता. या टाकलेल्या वायरमधील वीज प्रवाह संपूर्ण परिसरात आणि जमिनीत उतरला होता. म्हशी चरत असताना या धोकादायक वीज प्रवाहाचा त्यांना जोरदार झटका बसला. या भीषण अपघातात एक जाफराबादी आणि एक म्हशान जातीची म्हैस जागीच दगावली. आपल्या पाळीव जनावरांचा मृत्यू झाल्याचे पाहून फिर्यादी यांनी तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३२५ अन्वये आरोपी अशोक कराळे आणि आबा कराळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अकोलकर या घटनेचा पुढील तपास करत आहेत.


**CHANGE OF NAME**

I have changed my old name SATISH BABAN BOBADE (the name of my school leaving certificate ) j My new name is SATISH BABANRAO BOBADE (the name of my aadhar card) Both names are I am same person, not any other Person.
AFF No 2552242041268100642771
Date 11/12/2025

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME SHAGUFATA SAJID KHAN ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SHAGUFTA SAJID KHAN (AADHAR NO.4840 7173 4632) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 30/06/2026


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि .०१ जुलै २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२४ ४६७ ७०५ | ७-१ | १२५ १६२ १०९ | जोड १६-२१-३४-०८--५८ |

**कल्याण**
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ ६३५ | जोड ९०-१२-३४-८६-२९ |

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९ ४८० २२८ | २-० | १९० २८० २४४ | जोड २१-७०-३८-६४-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# वारी पुलावरून मधुकर टेके यांची कोल्हेंवर टीका 'जनतेच्या सुखात समाधान शोधायला शिका'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


**कोळपेवाडी :** वारी पुलाचे काम पूर्ण झाल्याने परिसरातील नागरिकांचा चार दशकांचा प्रश्न मार्गी लागला असून, या विकासकामाचे श्रेय घेण्याचा अधिकार आमदार आशुतोष काळे यांनाच असल्याचा दावा करत माजी सभापती मधुकर टेके यांनी कोल्हे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात टेके म्हणाले की, वारी पुलामुळे वारीसह पंचक्रोशीतील नागरिकांचा ४० वर्षांचा वनवास संपला आहे. नागरिकांनी पुलाचे काम पूर्ण करणाऱ्या आमदार आशुतोष काळे यांचे स्वागत करून आनंद व्यक्त केला. मात्र, हे यश काहींना खटकत असून त्यातूनच पुलाबाबत अनावश्यक राजकारण केले जात आहे, असा आरोप त्यांनी केला.



कोल्हे यांना दीर्घकाळ सत्तेत राहूनही वारी पुलाचा प्रश्न सोडविता आला नाही, असा दावा करत टेके यांनी विकासकामांवरून जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका केली. सिंचन, पाणीप्रश्न आणि विविध विकासकामांबाबत जनतेला वास्तव माहिती असून, कोणत्या लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाठपुरावा करून निधी आणला आणि कामे पूर्ण केली, याची जाणीव नागरिकांना असल्याचे ते म्हणाले. "जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरल्याचे वास्तव स्वीकारावे आणि जनतेच्या सुखात समाधान शोधायला शिकावे," असा सल्लाही टेके यांनी दिला. तसेच विकासकामांवर राजकारण करण्याऐवजी जनतेच्या हिताला प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले.

## निधन वार्ता

### लेखक भास्कर देशमुख



**अहिल्यानगर :** ज्येष्ठ साहित्यिक, निवृत्त प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी तथा विपुल लेखन करणारे लेखक भास्कर पर्वतराव देशमुख (वय ७९) यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शासकीय सेवेत त्यांनी मराठवाडा विभागाचे प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी म्हणून सुमारे २० वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली.

### बाबासाहेब गांगुर्डे



**टाकळीभान:** येथील शेतकरी बाबासाहेब रतन गांगुर्डे (४४ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी ,आई, दोन भाऊ, एक बहीण ,पुतणे , भावजई असा मोठा परिवार आहे. संतोष गांगुर्डे व अशोकनगर जिल्हा बँकेचे शाखाधिकारी संदीप गांगुर्डे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

### विमलबाई लोढा



**राहुरी :** येथील विमलबाई शांतीलाल लोढा (वय ८० वर्षे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, जावई नातू , पणतू व सुना असा परिवार असून राहुरीतील प्रसिद्ध व्यापारी राजकुमार व संतोषकुमार लोढा यांच्या त्या मातोश्री होत.

### पारुबाई जगताप



**वडाळा महादेव :** श्रीरामपूर येथील वार्ड नं. ०१, बोरावकेनगरमधील प्रसिद्ध संमोहन तज्ज्ञ डॉ. रामकृष्ण सोन्याबापू जगताप यांच्या मातोश्री पारुबाई सोन्याबापू जगताप यांचे वयाच्या ८५ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले अंबादास जगताप, डॉ. रामकृष्ण जगताप, पाच मुली असा मोठा परिवार आहे.

### तुषार बोरसे



**श्रीरामपूर, :** येथील संगमनेर रोडवरील श्री दत्त मोटार रिपरिंगचे मुन्ना फिटर उर्फ तुषार बाळासाहेब बोरसे (वय ४८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, बहीण, मेहुणे, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे, भावजाई असा परिवार आहे. ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र बोरसे व विनोद बोरसे यांचे बंधू मयूर बोरसे यांचे चुलते तर साई बोरसे यांचे वडील होत.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 5 | |

द • ख • ल

## ग्रामीण भागाच्या विकासासाठी कटीबद्ध : झावरे



**टाकळी ढोकेश्वर :** ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी आणि नागरिकांना मूलभूत सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नेहमीच कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले. पारनेर तालुक्यातील करंदी येथील बहुप्रतीक्षित पाणी पुरवठा योजनेसाठी नवीन विद्युत रोहित्र (ट्रांसफॉर्मर) बसविणे आणि गावांमधील स्ट्रीट लाईट बसविणे या विकासकामांचे भूमिपूजन झावरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सुजित झावरे पा. म्हणाले की,ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावणे हेच आमचे ध्येय आहे. पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र रोहित्र मिळाल्याने आता पाण्याचा प्रश्न कायमचा मिटण्यास मदत होईल तसेच नवीन स्ट्रीट लाईटमुळे गावाची सुरक्षितता आणि शोभा वाढेल. करंदी गावातील पाणी पुरवठा योजनेला अखंडित वीज पुरवठा व्हावा यासाठी नवीन विद्युत रोहित्र बसवण्याची मागणी ग्रामस्थांकडून बऱ्याच दिवसांपासून होत होती. तसेच गावातील रस्ते प्रकाशमान व्हावेत यासाठी स्ट्रीट लाईटचीही आवश्यकता होती. सुजित झावरे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून या दोन्ही कामांना मंजुरी मिळाली असून, प्रत्यक्ष कामाला आता सुरुवात झाली आहे. सुजित झावरे पाटील यांनी केलेल्या या विशेष प्रयत्नांबद्दल करंदीकरांनी त्यांचे आभार मानले. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## सहकार सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर, वृक्षारोपण

**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुका सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या वतीने सहकार सप्ताहानिमित्त रक्तदान शिबीर व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सहकार विभागाच्या वतीने दि.२९ जुन ते ६ जुलै या कालावधीत सहकार सप्ताहानिमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानुसार दि.३ जुलै रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पारनेर तसेच पारनेर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. पारनेर व बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. निघोज यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर येथील जिल्हा सहकारी बँकेच्या सॉलिसीटर गुलाबराव शेळके सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि.६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पारनेर येथील किसान इंटरनॅशनल स्कुल अँड जुनिअर कॉलेज येथे सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,पारनेर व किसान युनियन ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पारनेरचे सहाय्यक निबंधक विशाल दाते यांनी दिली.

## स्कूल कमिटीतर्फे मुख्याध्यापक पवार यांचा गौरव



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील पिंपरी कोलंदर येथील पद्मभूषण डॉ. वसंत दादा पाटील विद्यालय पिंपरी कोलंदर चे मुख्याध्यापक नवनाथ पवार सर यांचा विद्यालयाच्या स्कूल कमिटी कडून उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल नुकताच गौरव करण्यात आला. मुख्याध्यापक नवनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावीचा उत्तम निकाल व इयत्ता आठवीतील शिष्यवृत्ती परीक्षेतील विद्यालयाची उत्तम कामगिरी यामुळे हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी स्कूल कमिटीतील अध्यक्ष व सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब धोत्रे महाराज, निवृत्ती ओहोळ, बाबुराव ओहोळ, दादासाहेब ओहोळ, आबासाहेब ओहोळ, भाऊसाहेब ओहोळ, काकासाहेब बोबडे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यालयाच्या शिक्षिका अर्चना पवार (शिंदे) यांचे पती अमोल बाळासाहेब शिंदे यांनी विद्यालयासाठी एक कॉम्प्युटर संच भेट दिला आहे. त्याबद्दल स्कूल कमिटीने त्यांचाही सन्मान विद्यालयातर्फे करण्यात आला. यापुढेही विद्यालयास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन शिंदे यांनी दिले. ग्रामस्थांच्या सहकार्याबद्दल मुख्याध्यापक पवार यांनी आभार मानले.

## भोयरे गांगर्डा येथे घरफोडी
## ८५ हजारांचा ऐवज लंपास

**सुपा :** तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथे बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी ८५ हजार रुपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सुपा पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोयरे गांगर्डा येथील रहिवासी निवृत्ती गोपीनाथ पवार यांच्या बंद घराचे कुलूप तोडून २९ जूनला पहाटे ५.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून घरातील कपाटाची उचकापाचक केली. त्यामध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ८५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला. याबाबत निवृत्ती पवार यांनी सुपा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. सहा.पो.नि.माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. निमसे पुढील तपास करीत आहेत.

## भावकीच्या वादाची चौकशी करा : भाजपची मागणी



**कर्जत :** कुंभेफळ (ता.कर्जत) येथील शेतजमीनीचा वाद हा भावकीतील वाद असून यात संबंधित वकील असणाऱ्या व्यक्तीने यास आपल्या ज्ञानाचा वापर करीत वेगळ्या पद्धतीने समाजात मांडला. सदर घटनेची कर्जत पोलिसांनी निपक्ष आणि पारदर्शकपणे चौकशी करावी अशी मागणी कर्जत भाजपाकडून पोलीस निरीक्षक हनुमंत गायकवाड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. चरपटीनाथ पांडुरंग धोदाड आणि त्यांच्या कुटुंबियांनी मौजे कुंभेफळ (ता.कर्जत) गट क्रमांक १७६ मधील ०.८१ आर क्षेत्र ४ मे रोजी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे संबंधित जागेच्या मालकी व्यक्तीकडून कायदेशीर दृष्ट्या खरेदी केली होती. या खरेदीच्या फेरफार नोंदीसंदर्भात हरकत दाखल झाल्याने महसूल विभागासमोर सुनावणी देखील सुरू आहे. मात्र पूर्वीपासून जमिनीच्या बांधावरून अड संदीप शिवदास पाटील व चरपटीनाथ धोदाड यांच्यात भावकीतील वाद असल्याने या वादाचा सूड घेण्यासाठी संदीप पाटील यांनी वकील संघटनेच्या प्रभावाचा गैरफायदा घेत धोदाड कुटुंबीयांवर खोटे, बनावट व सूडबुद्धीने प्रेरित गुन्हे दाखल केल्याचा गंभीर आरोप भाजपा पदाधिकाऱ्यांनी निवेदनात केला. सदर घटनेत चरपटीनाथ उर्फ पप्पू पांडुरंग धोदाड व त्यांच्या कुटुंबीयांवरील खोट्या गुन्ह्यांची कर्जत पोलिसांनी सखोल चौकशी करावी.

# मतदार यादी पुर्ननिरीक्षणासाठी सहकार्य करा : डॉ. आशिया

## ३ हजार ८३० बीएलओ ३० जूनपासून घरभेटी घेणार!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातही विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमास प्रारंभ झाला असून, या मोहिमेद्वारे प्रत्येक पात्र मतदाराची नोंद अचूक व अद्ययावत करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलले. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सुनील गाढे, तहसीलदार श्रीमती श्वेता संचेती आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, १ ऑक्टोबर २०२६ हा या पुनरीक्षणासाठी पात्रता दिनांक म्हणून निश्चित करण्यात आला आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील ३ हजार ८३० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) प्रत्येक मतदाराच्या घरी भेट देऊन त्यांना गणना प्रपत्राचे वितरण करतील. या प्रपत्रात मतदारांची वैयक्तिक माहिती व आवश्यक कागदपत्रांची नोंद घेण्यात येणार असून, त्या आधारे प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले की, २९ जुलै २०२६ पर्यंत मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात येईल. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींचा निपटारा ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत करण्यात येणार असून, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांमध्ये ३ हजार ८३० मतदान केंद्रे असून, या कामासाठी १२ निर्वाचक नोंदणी अधिकारी, ३६९ सहायक निर्वाचक नोंदणी अधिकारी, ३ हजार ८३० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि ६ हजार ९७१ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी आवश्यक तयारी पूर्ण झाली आहे.

जिल्ह्यातील ३८ लाख १० हजार १०२ मतदारांपैकी ३२ लाख ५० हजार ६९३ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून, म्हणजेच ८५.३२ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. अकोले विधानसभा मतदारसंघात ९२.८४ टक्के, संगमनेरमध्ये ९२.३७ टक्के, शिर्डीमध्ये ८२.८८ टक्के, कोपरगावमध्ये ८५.०९ टक्के, श्रीरामपूरमध्ये ८७.९५ टक्के, नेवासामध्ये ८५.६५ टक्के, शेवगावमध्ये ८५.९२ टक्के, राहुरीमध्ये ८३.१६ टक्के, पारनेरमध्ये ८६.६६ टक्के, अहिल्यानगर शहरात ७१.१९ टक्के, श्रीगोंदामध्ये ८४.६८ टक्के आणि कर्जत–जामखेडमध्ये ८६.७४ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित मतदारांचे मॅपिंगही विहित कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. घरभेटीदरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

## किरकोळ वादातून पती-पत्नीला लोखंडी रॉडने बेदम मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका किरकोळ वादाचे पर्यावसान भीषण मारहाणीत झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. केकती परिसरातील यशवंतनगर येथील डेअरीफार्म जवळ सोमवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पीडित महिला आपल्या मुलाला सोडण्यासाठी मोपेड दुचाकीवरून जात होती. यावेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहनाने महिलेच्या गाडीला जोराची धडक दिली. या धडकेनंतर महिलेने आरोपीला 'गाडी व्यवस्थित चालवत जा' असा समजूतदारपणाचा सल्ला दिला. मात्र, या साध्या बोलण्याचा आरोपीला प्रचंड राग आला.

त्यातून चिडलेल्या आरोपीने आणि त्याच्या साथीदारांनी मिळून थेट त्या महिलेच्या कुटुंबाला लक्ष केले. आरोपींनी महिलेच्या पतीला, सासूला आणि सासऱ्यांना रस्त्यावर गाठून अत्यंत गलिच्छ भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर आरोपींनी संपूर्ण कुटुंबाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या राड्यादरम्यान आरोपीने जवळ असलेला लोखंडी रॉड काढून महिलेच्या पतीवर जबर हल्ला चढवला. या हल्ल्यात पती गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी तातडीने अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मारहाण केल्यानंतर आरोपींनी पीडित कुटुंबाला जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी सनी ऊर्फ सूरज ढोबळे, धीरज ढोबळे आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात आणि उपनिरीक्षक अकोलकर यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## भरदिवसा सोन्याची साखळी चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहर परिसरातील चांदणी चौक भागातील डी.ए.डी. कॉलनीमध्ये एक धाडसी चोरीची घटना उघडकीस आली आहे. घरासमोरून अज्ञात चोरट्याने एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची साखळी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुंजन ओमप्रकाश तिवारी या कामानिमित्त अहिल्यानगर येथे आल्या होत्या. २८ जूनच्या सकाळी ते २९ जूनच्या दुपारच्या दरम्यान त्या चांदणी चौक परिसरातील कॉलनीमध्ये होत्या. याच दरम्यान दबा धरून बसलेल्या एका अज्ञात चोरट्याने त्यांचा माग काढला. चोरट्याने कोणतीही चाहूल लागू न देता त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन लांबवली.

चोरीला गेलेला मुद्देमाल:

चोरट्याने चोरून नेलेली सोन्याची साखळी सुमारे ८ ग्रॅम वजनाची असून तिची किंमत ५० हजार रुपये आहे. चोरट्याने स्वतःच्या फायद्यासाठी ही चोरी केली.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. चोरीची ही संपूर्ण घटना समजताच कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी तातडीने पथकासह घटनास्थळाला भेट दिली. पोलिसांनी परिसरातील नागरिकांकडे चौकशी सुरू केली असून चोरट्याचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणा वेगाने फिरू लागली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कायद्यानुसार चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार इनामदार हे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत. भरदिवसा घडलेल्या या चोरीमुळे पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधण्यास सांगितले आहे.

## ट्रान्सफॉर्मरमधून तांब्याच्या तारेसह ऑईलची चोरी; गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** भिंगार जवळील जामखेड रस्त्यावरील एका भागात असलेल्या ट्रान्सफॉर्मरमधून अज्ञात चोरट्याने तांब्याची तार आणि तेल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात महेश जालिंदर मुंजाल (वय ३६, रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जून २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास जामखेड रस्त्यावरील राजेंद्र सिंग यांच्या क्षेत्राजवळ असलेल्या १६० केव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरला चोरट्यांनी लक्ष्य केले.

अज्ञात चोरट्याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी या ट्रान्सफॉर्मरमधून १ लाख २० हजार रुपये किमतीची १२० किलो तांब्याची तार आणि १९ हजार रुपये किमतीचे २१० लिटर ट्रान्सफॉर्मर तेल चोरून नेले. एकूण १ लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. या घटनेनंतर महेश मुंजाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून २९ जून रोजी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आर. एस. मिसाळ करत आहेत. पोलीस या भागातील संशयितांची चौकशी करत असून अज्ञात चोराचा शोध घेत आहेत.

## ग्राउंड फ्लोअरवरच जागा द्या; नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटनेचा इशारा

### उपमहापौरांच्या उपस्थितीत महापालिकेत महत्त्वपूर्ण बैठक

### मूळ गाळेधारकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पुन्हा पेटला

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** नेहरू मार्केटच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या नव्या व्यापारी संकुलामध्ये मूळ गाळेधारक व ओटेधारकांचे पुनर्वसन ग्राउंड फ्लोअरवरच करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी मंगळवारी (दि. ३० जून) अहिल्यानगर महानगरपालिकेत उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयात महापालिकेने दिलेल्या प्रतिज्ञापत्राची आठवण करून देत, त्यानुसार पुनर्वसनाची लेखी हमी तातडीने द्यावी, अन्यथा न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा दिला.

या बैठकीला प्रकल्प अधिकारी राजेंद्र मेहेत्रे यांच्यासह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी मूळ गाळेधारक व ओटेधारकांच्या पुनर्वसनाचा मुद्दा ठामपणे मांडत, व्यापारी संकुलातील जागा ग्राउंड फ्लोअरवरच देण्याची मागणी केली.

अहिल्यानगर शहरातील सर्वसामान्य नागरिकांना ताज्या भाज्या सहज उपलब्ध व्हाव्यात आणि गोरगरीब भाजी विक्रेत्यांना कायमस्वरूपी व्यवसायाचे ठिकाण मिळावे, या उद्देशाने तत्कालीन नगराध्यक्ष स्वर्गीय नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात चितळे रोडवरील मध्यवर्ती ठिकाणी नेहरू मार्केटची उभारणी करण्यात आली होती. अनेक वर्षे शेकडो कुटुंबांचा उदरनिर्वाह या मार्केटवर अवलंबून होता. मात्र, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर या जागेवर आधुनिक व्यापारी संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आणि सुमारे १५ वर्षांपूर्वी नेहरू मार्केट जमीनदोस्त करण्यात आले. त्यानंतर मूळ गाळेधारक व ओटेधारकांना पर्यायी व्यवस्था न मिळाल्याने अनेकांना रस्त्यावर व्यवसाय करण्याची वेळ आली.

पुनर्वसनाच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांत गाळेधारकांनी व भाजी विक्रेता संघटनेने विविध आंदोलने, निवेदने आणि पाठपुरावा केला. मात्र, प्रश्न मार्गी न लागल्याने संघटनेचे अध्यक्ष संजय झिंजे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. या प्रकरणात अहिल्यानगर महानगरपालिकेने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करून नेहरू मार्केटमधील १४ गाळेधारक आणि ७० ओटेधारक भाजी विक्रेत्यांचे नव्या व्यापारी संकुलामध्ये पुनर्वसन करण्यात येईल, अशी स्पष्ट हमी दिली होती. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, महापालिकेने न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार ७० ओटेधारकांकडून केवळ नाममात्र भाडे आकारण्यात येणार असून, १४ गाळेधारकांकडून फक्त बांधकामाचा नाममात्र खर्च घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

यावेळी संजय झिंजे यांनी, ग्राउंड फ्लोअरवरच पुनर्वसन व्हावे, या मागणीवर आम्ही ठाम आहोत. प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, असे स्पष्ट सांगितले. बैठकीला नेहरू मार्केट भाजी विक्रेता संघटनेचे आर. डी. करंदीकर, बी. बी. गौरी, अशोक लांडे, राजेंद्र चौधरी, रामभाऊ केळकर, रत्नाकर कोफ्लडके, बालाजी भुमय्या, पवन खेतमाळीस, रुपेश तरोटे, विजय चौधरी यांच्यासह अनेक गाळेधारक व ओटेधारक उपस्थित होते.

## मोहरम उत्सव शांततेत पोलीस दलाचा सन्मान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील ऐतिहासिक मोहरम उत्सव यंदा शांततेत आणि अत्यंत उत्साहात पार पडला. उत्सवादरम्यान सलग २२ तास अहोरात्र कर्तव्य बजावून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा हाजी हमीद तकिया ट्रस्ट'च्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या सत्कार सोहळ्यात माननीय पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, पोलीस उपअधीक्षक वैभव कलुबर्मे, शहर उपअधीक्षक दिलीप टिपरसे, तसेच तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व कर्मचारी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हाजी हमीद तकिया ट्रस्टचे सय्यद साबिर अली, 'स्नेहलय'चे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, रोहित मिस्किन, 'स्नेहलय इंग्लिश स्कूल'च्या मानद संचालिका श्रीमती कांचन पापडेजा यांनी पोलीस अधिकारी व पोलीसांचा सत्कार केला.

या कार्यक्रमाप्रसंगी स्टचे विश्वस्त अली सय्यद, सय्यद गालिब अली, सय्यद मोहम्मद अली, सय्यद राहबर अली, सय्यद रजा, सय्यद बिलाल, सय्यद शहा, सय्यद उवेज, रेहान शेख, अबूबकर शेख, ड. अनिकेत राठोड, राहुल चिंतामणी, मुस्तकीम भाई, फरान शेख, रेहान शेख, फरीद शेख तसेच ट्रस्टचे इतर विश्वस्त आणि मान्यवर उपस्थित होते. जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी पोलीस दलाच्या वतीने युवक–युवतींसाठी महाविद्यालयीनस्तरावर व्यसनमुक्तीचा उपक्रम घेतला जाणार असल्याची माहिती दिली. सय्यद साबिर अली यांनी हाजी हमीद तकिया ट्रस्ट व गिरीश कुलकर्णी यांनी स्नेहालय परिवार या उपक्रमात सहभागी होणार असल्याचे सांगितले.

# भांडेवाडीत पुन्हा बिबट्याची दहशत ; शेळी फस्त

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी तालुका :** तालुक्यातील मोहरी गावालगत असणाऱ्या भांडेवाडी येथे काल पुन्हा बिबट्याने रात्रीच्या वेळी शेळी फस्त केल्याने परिसरात दहशत पसरली आहे.याची गांभीर्याने दखल घेऊन वनविभागाने तातडीने या भागात अधिकचे पिंजरे लावावेत अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

पाथर्डी शहराच्या दक्षिण बाजूला गर्भगिरीची मोठी डोंगररांग आहे.या डोंगर रांगेतच मोहरी गाव असून,या गावालगत मोहटादेवी कडे जाणाऱ्या मार्गावर भांडेवाडी गावची छोटी वस्ती आहे.या वस्तीवर रात्री साडेनऊच्या वेळी बिबट्याने देवा ठोंबरे यांच्या गोठ्यातून एक शेळी जबड्यात धरून नेत असल्याचे कुत्र्यांनी पाहून जोरात भुंकण्यास सुरुवात केली.कुत्र्यांचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी धाव घेताच बिबट्याने काही अंतरावर गेल्यानंतर तोंडातली शेळी तेथेच सोडून धूम ठोकली.मात्र दोन तासानंतर पुन्हा साडेअकरा वाजता शेळी सोडलेल्या ठिकाणी बिबट्या आला.पुन्हा बिबट्या आलेला दिसतात नागरिकांनी हातात लाठ्या – काठ्या,बॅटरी आदि साहित्य घेऊन बिबट्याच्या दिशेने धाव घेतली.गावातील नागरिक आपल्याकडे येत असल्याचे पाहून बिबट्याने पुन्हा डोंगराकडे धाव घेऊन अंधारात गडप झाला.एकाच जागी काही वेळातच दोनदा बिबट्या आल्याने परिसरातील नागरिकात प्रचंड भीती पसरली.व बिबट्या पुन्हा शेळीला घेण्यासाठी येईल अशी भीती मनात बाळगत अबाल – वृद्धांनी संपूर्ण रात्र जागून काढली. बिबट्याच्या दहशतीमुळे रात्रीच काय दिवसादेखील घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे.

अशातच शाळा,विद्यालय सुरू झाल्याने मुलांना शाळेत पाठवायचे कसे असा प्रश्न ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला आहे.

दरम्यान सकाळी वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनाधिकारी वर्षा गीते व बाळासाहेब मरकड यांनी परिसराची पाहणी करून पंचनामा केला.

या परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने वनविभागाने मोहरी येथे एक पिंजरा मागील काही दिवसापूर्वी लावलेला आहे.अहिल्यानगर – बीड जिल्हा हद्दीवर असणाऱ्या मोहरी गावालगतच मोठी डोंगररांग असल्याने याभागात आणखी तीन ते चार पिंजरे लावावेत अशी मागणी नागरिकातून होत आहे.



**...गाव सोडण्याशिवाय पर्याय नाही – ठोंबरे**

या भागामध्ये वर्षभर बिबट्यांचा वावर असतो.कधी रात्री तर कधी दिवसा बिबट्याचे दर्शन होत असल्याने नागरिकात प्रचंड दहशतीचे वातावरण पसरले आहे.या भागाकडे वन विभागाने विशेष बाब म्हणून लक्ष देऊन पिंजऱ्यांची संख्या वाढवावी.अशाच घटना घडत राहिल्या तर,आम्हाला गाव सोडण्याशिवाय पर्याय नाही.

**देवा ठोंबरे,ग्रामस्थ भांडेवाडी**

**नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये : मंचरे**

बिबट्याच्या वाढत्या घटना मुळे मागील काही दिवसापूर्वी मोहरी शिवारात एक पिंजरा लावण्यात आलेला आहे.भांडेवाडी व परिसरात आवश्यकतेनुसार आणखी एक ते दोन पिंजरे लावण्यात येणार आहेत.नागरिकांनी अफवावर विश्वास ठेऊ नये.या भागात गस्त वाढवली जाणार असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये.

**बबन मंचरे,वन परिमंडळ अधिकारी**

द•ख•ल

## वाघळवाडीतील १०० बेडच्या रुग्णालयाच्या कामाला वेग



**सोमेश्वरनगर** : बारामती विधानसभा मतदारसंघातील वाघळवाडी–सोमेश्वरनगर(ता बारामती) येथे उभारण्यात येणाऱ्या १०० बेडच्या अत्याधुनिक रुग्णालयाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते जय पवार यांनी आज कामाच्या ठिकाणी भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. दिवंगत लोकनेते अजित पवार यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या या महत्त्वाकांक्षी आरोग्य प्रकल्पासाठी काही महिन्यांपूर्वी ७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, तातडीच्या आणि आधुनिक आरोग्य सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हाव्यात, हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश आहे. पाहणीदरम्यान जय पवारयांनी संबंधित अधिकारी व अभियंत्यांकडून कामाच्या प्रगतीची सविस्तर माहिती घेतली. रुग्णालयाचे बांधकाम उच्च दर्जाचे, गुणवत्तापूर्ण आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. कामामध्ये कोणतीही त्रुटी अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी यावेळी दिला. वाघळवाडी येथे उभारले जाणारे हे अत्याधुनिक रुग्णालय पूर्ण झाल्यानंतर बारामती तालुक्यासह सोमेश्वर पंचक्रोशीतील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या अनेक उच्चस्तरीय उपचार सेवा आता ग्रामीण भागातच उपलब्ध होणार असल्याने आरोग्य सुविधांच्या दृष्टीने हा प्रकल्प सोमेश्वर परिसरातील विविध गावांना फायद्याचा ठरणार असल्याने नागरिकांमध्ये समाधान आहे.

## 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान' योजनेसाठी ऑनलाइन अर्ज करा

**पुणे** : राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना अंतर्गत पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांकडून १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु. ५,००० मानधन देण्यात येते. अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक (दिव्यांगांसाठी ४० वर्षे), कला किंवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान, वार्षिक उत्पन्न रु. ६० हजारांपेक्षा कमी तसेच महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. विधवा, परित्यक्ता, दिव्यांग आणि वयोवृद्ध कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. इच्छुकांनी महाराष्ट्र शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलवर ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करावा. अर्जासोबत वय, आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला , बँक पासबुक आदी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत, असे आवाहन सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), भूषण जोशी यांनी केले आहे.

## पल्स पोलिओ लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांना घरोघरी जाऊन लस देणार

**पुणे** : जिल्ह्यात २८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेदरम्यान ज्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देता आले नाहीत, अशा सर्व बालकांचे पुढील तीन दिवस आरोग्य विभागामार्फत घरोघरी जाऊन लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. यावेळी त्यांनी पालकांना आवाहन करताना सांगितले की, आरोग्य विभागाचे कर्मचारी पुढील तीन दिवस घराघरात भेट देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजणार आहेत. त्यामुळे पालकांनी आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करून आपल्या बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत. ''एकही बालक पोलिओ प्रतिबंधक लसीपासून वंचित राहू नये, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे,'' असे नमूद करत मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पाटील यांनी सर्व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून ''पोलिओमुक्त पुणे – निरोगी पुणे'' घडविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# अन्न व औषध प्रशासनाची पुणे विभागात धडक कारवाई १३.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : अन्न व औषध प्रशासनाने 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत २५ ते २७ जून २०२६ या कालावधीत पुणे व सोलापूर जिल्ह्यात दूध, दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया उद्योग तसेच हॉटेल आस्थापनांवर विशेष तपासणी मोहीम राबवून सुमारे १३ लाख ७१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त व नष्ट केला.शिरूर तालुक्यातील गगनगिरी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स येथे भेसळीचा संशय आल्याने १२,२७८ लिटर दूध नष्ट करून संबंधित अन्न परवाना निलंबित करण्यात आला.



आंबेगाव येथील उमिया मिल्क प्रॉडक्टमध्ये अस्वच्छ वातावरणात उत्पादन होत असल्याने १,१५५ किलो एडिबल केसिनेट व कोयागुलम जप्त करून परवाना निलंबित करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यातील रामदेव डेरी येथे विनापरवाना व अस्वच्छ ठिकाणी मिठाई उत्पादन होत असल्याने १८०७ किलो मिठाईचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला.

तसेच माळशिरस तालुक्यातील शेतकरी राजा दूध संकलन केंद्रातील ८० लिटर दूध नष्ट करून परवाना निलंबित करण्यात आला.

याशिवाय, ताथवडे (पुणे) येथील गुड फूड रोल हाऊस तंदुरी हाऊस या आस्थापनात गंभीर त्रुटी आढळल्याने त्याचा अन्न परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाने अन्न व्यवसायिकांनी अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे तसेच ग्राहकांनी दूध व दुग्धजन्य पदार्थ खरेदी करताना लेबल, उत्पादन दिनांक, वापरण्याची अंतिम तारीख आणि ऋडडअख परवाना क्रमांक तपासूनच खरेदी करावी, असे आवाहन केले आहे.

## वाहतूक नियमांचे पालन करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर** : शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी शिरूर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांना वाहन चालविताना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी सुरक्षित प्रवासास प्राधान्य देत सर्व आवश्यक कागदपत्रे व नियमांचे पालन करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. ावेळी वाहनचालकांसाठी काही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहन चालविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे वैध वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) असणे आवश्यक आहे. प्रत्येक वाहनावर पुढील व मागील बाजूस नियमानुसार नोंदणी क्रमांक (नंबर प्लेट) लावलेला असावा. तसेच वाहनाची सर्व आवश्यक शासकीय कागदपत्रे जसे की नोंदणी प्रमाणपत्र (आरसी), विमा (इन्शुरन्स), प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) तसेच इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवून वाहनासोबत बाळगावीत. वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करणे, दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करणे, चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्ट लावणे यासह सर्व सुरक्षाविषयक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय वाहनांच्या काचांवर नियमबाह्य ब्लॅक फिल्म लावू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शिरूर पोलीस स्टेशनकडून वेळोवेळी नाकाबंदी व पेट्रोलिंगदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत असते. अशा कारवाईदरम्यान नियमांचे पालन करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी सर्व वाहनचालकांनी वरील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले. वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित, जबाबदार व कायद्याचे भान ठेवणारे नागरिक म्हणून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन शिरूर पोलीस स्टेशनतर्फे करण्यात आले आहे.

# नेत्ररोपणाने मिळाली नवी दृष्टी; नारायणगावात अत्याधुनिक शस्त्रक्रिया यशस्वी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नारायणगाव** : जुन्नर तालुक्यातील वंदना खंडू डुंबरे (वय ६३) यांच्या डाव्या डोळ्यावरील यशस्वी नेत्ररोपण शस्त्रक्रियेमुळे त्यांना पुन्हा दृष्टी प्राप्त झाली आहे. डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशनच्या गॅलेक्सी आय हॉस्पिटल, नारायणगाव येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली असून ग्रामीण भागातही अशा प्रकारच्या नेत्ररोपण शस्त्रक्रिया उपलब्ध झाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत माहिती देताना संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी सांगितले की, वंदना डुंबरे यांच्या डोळ्याच्या बुबुळावर लहानपणापासून पांढरा डाग असल्याने त्यांना अंधत्व आले होते. अनेक ठिकाणी उपचार करूनही अपेक्षित यश मिळाले नव्हते. गॅलेक्सी आय हॉस्पिटलमध्ये तपासणीनंतर नेत्ररोपणाचा सल्ला देण्यात आला. नेत्रदात्याकडून योग्य कॉर्निया उपलब्ध झाल्यानंतर ३० मे २०२६ रोजी कॉर्निया नेत्रतज्ज्ञ डॉ. आरुषी गोयल देशमुख यांनी यशस्वी नेत्ररोपण शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला डाव्या डोळ्याने स्पष्ट दिसू लागल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला.डॉ. डोळे यांनी सांगितले की, ग्रामीण भागात आजही डोळ्यांच्या आजारांबाबत अनेक गैरसमज आहेत. डोळ्यात कचरा गेल्यास तो जिभेने किंवा कापसाने काढणे, झाडाचा चिक किंवा शेळीचे दूध डोळ्यात टाकणे, तसेच मंत्रतंत्रावर विश्वास ठेवणे यामुळे डोळ्यांना गंभीर संसर्ग होऊन कॉर्निया खराब होऊ शकतो. लहान मुलांच्या डोळ्यात पांढरा ठिपका दिसल्यास मध घालण्यासारखे चुकीचे उपायही धोकादायक ठरतात. तिरळेपणा, जन्मजात पाणी येणे किंवा पापणी पडणे यांसारख्या समस्या वेळेत ओळखून उपचार केल्यास दृष्टी वाचवता येते.त्यांनी सांगितले की, डोळ्याच्या पुढील पडद्याला संसर्ग झाल्यास काही रुग्णांना कॉर्निया बदलण्याची शस्त्रक्रिया करावी लागते. ही सुविधा संस्थेच्या महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त माधव नेत्रपेढीमार्फत उपलब्ध आहे. समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षितपणा आणि उपचारांविषयीचे अज्ञान दूर करण्यासाठी नेत्रतपासणी शिबिरे, शालेय तपासणी, जनजागृती मोहीम आणि नेत्रदानाबाबत प्रबोधनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले,त्यूनंतर नेत्रदान केल्यास अंध व्यक्तीला नवी दृष्टी मिळू शकते. त्यामुळे प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जपत नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन संस्थेचे विश्वस्त डॉ. संदीप डोळे यांनी केले.

# 'सोमेश्वर'परिसरात वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

### मुसळधार पाऊस पडू दे शेतकरी राजा सुखी होऊ दे अशी प्रार्थना करत वटवृक्षाची पूजा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर** : बारामतीच्या पश्चिम भागात ठिकठिकाणी सोमवारी (दि.२९) वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. सोमेश्वरनगर करंजे येथील ज्येष्ठ युवा महिला एकत्र येत वडाच्या झाडाचे पूजन केले. औक्षण करून, नैवेद्य दाखवून असंख्य महिलांनी वडाच्या झाडाला सूत बांधून, सात जन्माची गाठ मजबूत ठेवण्याचे साकडे घातले. यावेळी सकाळच्या सुमारास वडाच्या झाडाजवळ महिलांची अलोट गर्दी झाली होती.



छायाचित्र विनोद गोलांडे) वटवृक्षाची मोनोभावी ...मोठ्या उत्साहात पूजा करताना महिला वर्ग.

वटपौर्णिमेनिमित्त सोमवारी सकाळपासूनच सुवासिनींमध्ये पूजेची लगबग सुरू झाली होती. साजशृंगार करून हातामध्ये पूजेचे ताट घेऊन महिलांनी वडाच्या झाडाला सात फेऱ्या मारून वडाच्या झाडाची मनोभावे पूजा केली. आंबे, केळी, फुले, हळद-कुंकू साहित्याने वडाची पूजा करत सुवासिनींनी जन्मोजन्मी हाच पती लाभो, अशी प्रार्थना केली. यावेळी महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून आंब्याचे वाण दिले. काही महिलांनी परंपरेपरेनुसार वडाच्या झाडाचे पूजन केल्यानंतर वृक्षारोपणाचे महत्त्वही स्पष्ट केले. गेल्या वर्षीच्या मानाने यंदा पाऊस काळ कमी असल्याने मुसळधार पाऊस पडून दे शेतकरी राजा सुखी होऊ दे अशी अशी प्रार्थना करत वटवृक्षाची पूजा केली.

आख्यायिकेनुसार, सत्यवान आणि सावित्री या दाम्पत्याच्या आयुष्यात आलेला एक दिवस म्हणून वटपौर्णिमा आधुनिक युगातही तितक्यात पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. परंपरेप्रमाणे वटवृक्ष असलेल्या ठिकाणी वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. विशेष म्हणजे, पावसानेही सकाळपासून हजेरी लावली होती. मात्र, त्याचा विचार न करता, आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिला वटवृक्षाच्या पूजनासाठी घराबाहेर पडल्या. ज्येष्ठ महिलांसह नव्या पिढीतील सुवासिनींसोबत नववविवाहितांनीदेखील वटपौर्णिमेचे व्रत मनोभावे केले. त्यामुळे पौर्णिमेनिमित्त सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

वटपौर्णिमा या सणाच्या निमित्ताने सर्वाधिक ऑक्सिजन देणाऱ्या वडाच्या भव्य झाडाची सुरक्षा पूर्वापार चालत आली आहे. झाडाची पूजा करा, झाडे तोडू नका असा संदेशही व्रतातून दिला जातो.

## तळेगाव ढमढेरे- शिक्रापूर रस्त्यावर ट्रक उलटला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे** : शिक्रापूर- न्हावरा रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून संथ गतीने सुरु असुन यामुळे वेळोवेळी छोटे मोठे अपघात व वाहने उलटण्याच्या घटना घडत आहेत. नुकतेच एका कंपनीची मशीन घेऊन जाणारा ट्रक उलटला असून सुदैवाने कोणतीही जिवीत हानी झाली नसून ट्रक व मशीनचे मोठे नुकसान झाले आहे. तळेगाव ढमढेरे- शिक्रापूर रस्त्याने एम एच १२ एफ झेड ४०४५ हा ट्रक चाकण येथील एका कंपनीची मशीन घेऊन श्रीगोंदा येथे चाललेला असताना शिक्रापूर येथे सुरु असलेल्या रस्त्याचे कामाच्या ठिकाणी मशीन हलल्याने ट्रक अचानक उलटला दरम्यान ट्रक चालक सचिन नाना भिसे (वय २६ वर्षे रा. वांगदरी ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर) हा किरकोळ जखमी होऊन सुदैवाने बचावला, घटनेची माहिती मिळताच पोलीस हवालदार मिलिंद देवरे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता ट्रक व मशीनचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले, यावेळी क्रेनच्या मदतीने ट्रक सरळ करुन बाजूला घेण्यात आला, तर सध्या रस्त्याचे काम सुरु असल्याने वाहन चालकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




शिक्रापूर (ता. शिरुर) येथील शिक्रापूर तळेगाव रस्त्यावर उलटलेला ट्रक **(छायाचित्र आकाश भोरडे)**

# सणसवाडीत शेजारच्याच्या सतर्कतेने उघड झाली चोरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे,** : सणसवाडी (ता. शिरुर) येथील श्री बालाजी ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये ठेवलेल्या दहा इलेक्ट्रिक मोटार तिघा युवकांनी चोरुन नेल्याची घटना घडली असताना शेजारील दुकानदाराने एका युवकाला ओळखल्याने सदर चोरी उघड झाली असताना शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अजय हनुमंत जाधव, संतोष बालाजी लोहार व वैभव अशोक भुमरे या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सणसवाडी (ता. शिरुर) येथे असलेल्या श्री बालाजी ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये संदेश साकोरे यांच्या दुकानाच्या नवीन इलेक्ट्रिक मोटार ठेवलेल्या होत्या, रात्रीच्या सुमारास काही युवकांनी श्री बालाजी ट्रान्सपोर्टच्या ऑफिसचे शटर उघडले असल्याने शेजारील एका दुकानदाराला दिसले त्यावेळी त्याने अजय जाधव याला ओळखले, दरम्यान त्या दुकानदाराने याबाबतची माहिती श्री बालाजी ट्रान्सपोर्ट ऑफिस चालक रामदास सासवडे यांना दिल्याने सासवडे यांनी ऑफिसची पाहणी करुन अजय याचा शोध घेत चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने दहा मोटार चोरी केल्याचे सांगितले, याबाबत रामदास आनंदराव सासवडे (वय ५८ वर्षे रा. बुरुंजवाडी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अजय हनुमंत जाधव, संतोष बालाजी लोहार व वैभव अशोक भुमरे (सर्व रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करत त्यांना अटक केली असून पुढील तपास पोलीस हवालदार राकेश मळेकर हे करत आहे.

# आषाढीवारीच्या पार्श्वभूमीवर आळंदीत सुरक्षा, स्वच्छता व शिस्तीवर भर धर्मशाळा व मंगल कार्यालय चालकांची संयुक्त बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी** : आगामी आषाढीवारीच्या पार्श्वभूमीवर आळंदी पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व धर्मशाळा व्यवस्थापक तसेच मंगल कार्यालय मालक व चालक यांची संयुक्त आढावा बैठक पार पडली. लाखो वारकऱ्यांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर घातपात प्रतिबंध, महिला सुरक्षा, वाहतूक नियोजन, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

बैठकीत वरीष्ठ पोलीस निरीक्षक बी.एस.नरके यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वारी काळात सुरक्षा आणि शिस्त राखण्यासाठी सर्व संबंधितांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. विशेषतः ४ जुलै ते ९ जुलै या कालावधीत धर्मशाळा व मंगल कार्यालयांमध्ये विवाह सोहळे आयोजित करू नयेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. महिला वारकऱ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत मुक्कामस्थळी आवश्यक खबरदारी घेणे, संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना माहिती देणे. सीसीटीव्ही व्यवस्था कार्यान्वित ठेवणे आणि मुक्कामासाठी येणाऱ्या व्यक्तींची नोंद ठेवण्याबाबत सूचना करण्यात आल्या.मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी पाणीटंचाईची पार्श्वभूमी लक्षात घेऊन पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले. तसेच धार्मिक कार्यक्रमांदरम्यान ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.स्वच्छता आणि पर्यावरणपूरक वारीसाठीही बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. शिल्लक अन्न रस्त्यावर टाकू नये किंवा इंद्रायणी नदी घाटावर वाटप करू नये, धर्मशाळांमध्ये मुक्कामादरम्यान दोन गटांमध्ये वाद निर्माण होणार नाहीत यासाठी व्यवस्थापकांनी सतर्क राहावे, असे स्पष्ट सांगण्यात आले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले की परीसर स्वच्छ ठेवणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि प्लास्टिक पत्रावळींचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच माजी नगरसेवक डि. डि.भोसले म्हणाले की वारीतील दिंड्यांसोबत येणारी वाहने मुख्य रस्त्यांवर किंवा वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या ठिकाणी पार्क होणार नाहीत यासाठी विशेष नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी गटनेते सचिन उपस्थित होते. सर्व धर्मशाळा व मंगल कार्यालय चालकांनी प्रशासन व पोलिसांना पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

# न्यायालयाच्या या निर्णयामुळे पिडीतेला व तिच्या कुटुंबियांना खरोखरच न्याय मिळाला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** - नसरापूर प्रकरणात न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली असून न्यायालयाच्या या निर्णयामुळे पिडीतेला व तिच्या कुटुंबियांना खरोखरच न्याय मिळाला आहे. शिवाय या निर्णयामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करतानाच न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी मनापासून स्वागत केले आहे.

### न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला : - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुरडीवर अत्याचार करुन अत्यंत निर्घृणपणे हत्या करणाऱ्या भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. अवघ्या दोन महिन्यात घटनेची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला हा पहिलाच खटला ठरला आहे असेही सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या.

अशा क्रूर विकृताला समाजात कोणतेही स्थान नाही. या निकालामुळे कायद्याचा धाक निर्माण झाला असून असे कृत्य पुन्हा करण्यास नराधम धजावणार नाहीत असे सांगतानाच निष्पाप मुलींना व महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी तपास यंत्रणा व सरकार नेहमीच पाठीशी उभे आहे असा विश्वास सुनेत्रा अजित पवार यांनी दिला. या प्रकरणामध्ये वकीलांनी चांगल्या पध्दतीने काम केले असून त्यांचे सुनेत्रा



अजित पवार यांनी मनापासून आभार मानले आहे.

भविष्यात महिलांना, मुलींना तसेच बालकांच्या सुरक्षिततेसाठी सरकार कठोरातील कठोर पाऊले उचलेल असा विश्वास देतानाच आम्ही सर्वजण पिडीत कुटूंबाच्या दुःखात त्यांच्या पाठीशी आहोत. अशा घटना पुन्हा – पुन्हा घडू नयेत यासाठी समाज आणि सरकार एकत्रितपणे ठोस पावले उचलेल असेही सुनेत्रा पवार यांनी नमूद केले.

दरम्यान पुणे ग्रामीण पोलिसांनी याप्रकरणी तातडीने पावले उचलली व विशेष तपास पथक स्थापन करुन पिडीतेला न्याय मिळवून दिला त्याबद्दलही सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांचे आभार मानले आहे.

# प्रशासकीय अधिकाऱ्याविरोधात तक्रार दाखल

### आरोग्य संचालनालयातही तक्रार करणार : नगरसेवक नवनाथ बल्लाळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती येथील स्टाफ भरती प्रक्रियेत स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत तसेच रुग्णसेवेत होत असलेल्या कथित हलगर्जीपणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बारामती नगर परिषदेच्या आरोग्य समितीचे सभापती व नगरसेवक नवनाथ बल्लाळ यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदनाद्वरे केली आहे.



नवनाथ बल्लाळ यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बारामती तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने मेडिकल कॉलेज व सर्वोपचार रुग्णालयाची उभारणी करण्यात आली. मात्र, रुग्णालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीमध्ये बारामती तालुक्यातील पात्र युवकांना डावलून इतर तालुक्यांतील उमेदवारांना प्राधान्य दिले जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे स्थानिक बेरोजगार युवकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, नुकत्याच घडलेल्या एका अपघातग्रस्त रुग्णाच्या उपचारप्रकरणात ड्युटीवरील कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे उपचारास विलंब झाल्याचा आरोप असून, या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी. तसेच रुग्णालयातील स्टाफ रुग्णसेवेसाठी जबाबदारीने काम करेल, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात.

भरती प्रक्रियेत आर्थिक देवाण-घेवाण झाल्याच्या चर्चेचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला असून, काही अधिकाऱ्यांच्या मर्जीतील उमेदवारांची नियुक्ती झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मागील काही महिन्यांपासून भरती प्रक्रियेसंदर्भातील माहिती व कंत्राटी कर्मचाऱ्यांची यादी उपलब्ध करून देण्यात येत नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बारामती तालुक्यातील सर्व समाजातील पात्र युवकांना समान संधी मिळावी, भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक व्हावी आणि स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय होणार नाही, यासाठी तातडीने योग्य ती चौकशी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी नवनाथ बल्लाळ यांनी केली आहे. या निवेदनाची प्रत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांनाही देण्यात आली असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून रुग्णालयातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रसंगी अभ्यंगत मंडळ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालय बारामती सदस्य नगरसेवक बिरजू मांढरे,माजी नगरसेवक समीर चव्हाण, गौरव अहिवळे. निलेश मोरे, संकेत शिंदे उपस्थित होते

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## राहुरी शहरात एकाची गळफास घेऊन आत्महत्या



राहुरी : शहरातील राजेंद्र शिंदे यांनी दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. ३० जून रोजी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली. राजेंद्र लहानू शिंदे, (वय ५९ वर्षे, रा. राहुरी) यांनी दि. ३० जून रोजी पहाटेच्या सुमारास शहरातील वने हॉस्पिटल शेजारी असलेल्या अंडर ग्राऊंड गाळ्याच्या ग्रील ला दोरी बांधून गळफास घेतला. सकाळी ८.३० वाजे दरम्यान एका महिलेने त्यांना त्या ठिकाणी फासावर लटकलेले पाहीले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुलसीदास गिते, हवालदार संदिप ठाणगे यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. स्थानिक तरुणांच्या मदतीने राजेंद्र शिंदे यांना ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. त्यानंतर त्यांच्या मृतदेहावर शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यान राजेंद्र शिंदे यांच्या खिशात सुसाईट नोट मिळुन आली. त्यामध्ये लिहिले की, दोन महिन्यापासून आजारी आहे. जीवनाला कंटाळून मी आत्महत्या करत असून यामध्ये कोणाला दोषी धरु नये. राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. राजेंद्र लहानू शिंदे यांच्या पश्चात भाऊ, दोन मुले, सुन, नातू असा परिवार आहे.

# पुणे हायस्पीड, राहुरी-शिंगणापूर रेल्वे प्रकल्पांसाठी आज मुख्यमंत्र्यांशी चर्चा

### अहिल्यानगर, नाशिक, पुण्याचे शिष्टमंडळ फडणवीस यांना भेटणार : विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नाशिक - पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग आणि राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे प्रश्नाच्या संदर्भात नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवार दिनांक १ जुलै रोजीच भेट घेवून त्यांच्याकडे चर्चा करणार आहे. केंद्र शासनाच्या स्तरावर पाठपुरावा करून याबाबत यशस्वी तोडगा काढण्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानभवनात आयोजित बैठकीत सांगितले.



नाशिक - पुणे हायस्पीड रेल्वे मार्गाबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस आमदार सर्वश्री माणिकराव कोकाटे, शरद सोनवणे, बाबाजी काळे, विठ्ठल लंघे, शिवाजी आढळराव पाटील, सत्यजित तांबे, प्राजक्ता तनपुरे, अमोल खताळ, अक्षय कर्डिले उपस्थित होते. तर माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे बैठकीत सहभाग घेतला.

मंत्री श्री विखे पाटील म्हणाले, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या सोबतही या रेल्वे मार्गाबाबत चर्चा करण्यात येईल. त्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळही दिल्लीला जाऊन त्यांची भेट घेईल. हा रेल्वे मर्ग नाशिक, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या रेल्वे मार्गामुळे एक वेगवान संपर्क जोडणी पुणे ते नाशिक या दोन महानगरा दरम्यान निर्माण होईल. त्यामुळे राज्याचाही गतीने विकास होईल. पुणे नासिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत जनतेच्या भावना विचारात घेवून या प्रश्नाबाबत सकारात्मक निर्णय व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

राहुरी शनिशिंगणापूर रेल्वे मार्गाच्या संदर्भात असलेल्या या रेल्वे मार्गाच्या बाबतीत बैठकीत चर्चा झाली.या प्रश्नाबाबत शेतकर्याच्या असलेल्या भावना मुख्यमंत्र्याच्या निदर्शानास आणून देणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

माजी मंत्री आ.दिलीप वळसे पाटील यांनी बैठकीत सहभाग घेताना सांगितले की,पुणे नासिक रेल्वे प्रकल्पाच्या संददर्भात केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केली असून जीएमआरटीच्या अडचणी दूर होवू शकतात ही बाब त्यांच्या निदर्शानास आणून दिली आहे.काही देशांमध्ये आशा पध्दतीच्या अडचणी असताना रेल्वे मार्गाची काम झाली असल्याचा दाखला देवून यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा लागेल.मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ नेण्याची सूचना त्यांनी केली.

## बेलापुरात विनापरवाना मिरवणूक; दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर –** तालुक्यातील बेलापूर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनापरवाना मिरवणूक काढल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिसांत दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हाधिकार्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेलापूर गावात २७ जून रोजी रात्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ही मिरवणूक गावातील कोल्हार चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि बालाजी मंदिर ते नवशा हनुमान मंदिर या मार्गावरून काढण्यात आली.

**पोलीस प्रशासनाचे आवाहन**

**शहरात व ग्रामीण भागात शांतता आणि सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी नागरिकांनी कोणत्याही कार्यक्रमाचे किंवा मिरवणुकीचे आयोजन करताना प्रशासनाची रीतसर परवानगी घेणे बंधनकारक आहे. नियमांचे उल्लंघन करणार्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.**

सध्या परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकार्यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केलेले आहेत. असे असतानाही, प्रशासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ही मिरवणूक काढण्यात आली. जिल्हाधिकार्यांच्या आदेशाचे थेट उल्लंघन झाल्याचे निर्दशनास आल्यानंतर पोलिसांनी तात्काळ पावले उचलली आहे. या प्रकरणी विनापरवाना मिरवणुकीचे आयोजन करून शासकीय आदेशाचा भंग केल्याप्रकरणी ओंकार अनावडे आणि नितीन शर्मा या दोघांविरोधात श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहेत.

## पतीच्या त्रासाला कंटाळून माहेरी आलेल्या पत्नीला पुन्हा मारहाण

### जीवे मारण्याची धमकी, पतीविरुद्ध सोनई पोलिसांत गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घोडेगाव** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे पतीच्या सततच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून माहेरी आलेल्या विवाहितेला पुन्हा पतीकडून मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. पत्नीला सोबत घेऊन जाण्याच्या वादातून झालेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पीडित महिलेच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अंजली आप्पासाहेब इंगळे (वय ३०, रा. शहापूर) या काही दिवसांपूर्वी पतीच्या कथित त्रासाला कंटाळून घोडेगाव येथील माहेरी राहण्यासाठी आल्या होत्या. दरम्यान, २७ जून रोजी त्यांचे पती आप्पासाहेब रामकिसन इंगळे (रा. शहापूर) हे सासरी येऊन पत्नीला परत घरी घेऊन जाण्याचा आग्रह करू लागले.मात्र, तुम्ही दारू पिऊन मला मारहाण करता, वारंवार संशय घेऊन मानसिक त्रास देता, असे पत्नीने सांगत त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिला. याचा राग आल्याने आरोपीने शिवीगाळ व दमदाटी करत पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लाकडी काठीने मारहाण करून दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी तू माझ्यासोबत आली नाहीस तर तुला जिवंत ठेवणार नाही, अशी जीवे मारण्याची धमकीही आरोपीने दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.या प्रकरणी ३० जून रोजी सोनई पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. त्यानुसार गुन्हा रजिस्टर क्रमांक २९१/२०२६ अंतर्गत बीएनएस कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार मच्छिंद्र आडकीत्ते करीत आहेत. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ चिंताजनक ही घटना कौटुंबिक हिंसाचाराचे वाढते प्रमाण अधोरेखित करणारी आहे. दारूचे व्यसन, पत्नीवर संशय घेणे आणि वारंवार होणारी मारहाण यामुळे अनेक महिला माहेरी आश्रय घेण्यास भाग पडतात. अशा प्रकरणांमध्ये केवळ गुन्हा दाखल करण्यापेक्षा समुपदेशन, महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीचे संरक्षण आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे मत सामाजिक स्तरातून व्यक्त होत आहे.

## दीडवर्षांचा 'वनवास' संपला...!

### धुमाळवाडीतील पिढ्यान् पिढ्यांचा रस्ता अखेर पोलिसांच्या उपस्थितीत खुला...



पोलीस बंदोबस्तात मंगळवारी महसूल प्रशासन आणि पोलीस यांच्या उपस्थित रस्ता पूर्ववत सुरू करण्यात आला समवेत ग्रामस्थ.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** दुसऱ्याची अडवणूक करून स्वतःचा अहंकार सुखावणं एका शेतकऱ्याला चांगलंच महागात पडलं आहे. संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील डोळासणे गावांतर्गत असलेल्या धुमाळवाडी परिसरातील दत्तवाडीकडे जाणारा पिढ्यान् पिढ्यांचा हक्काचा शिवरस्ता (गट नंबर २९९/२) अखेर मोकळा श्वास घेतोय. एका आडमुठ्या शेतकऱ्याने गेल्या दीड वर्षांपूर्वी दादागिरी करत हा रस्ता चक्क बंद केला होता. मात्र, प्रांताधिकारी व तहसीलदारांच्या आदेशान्वये, पोलीस बंदोबस्तात मंगळवारी (३० जून) हा रस्ता पूर्ववत सुरू करण्यात आला असून दीड वर्षांपासून सुरू असलेला ग्रामस्थांचा 'वनवास' संपला आहे.

हा शिवरस्ता म्हणजे परिसरातील शेकडो एकर जमिनीतील शेतीमाल वाहतुकीचा मुख्य कणा होता. अनेक कुटुंबांची दैनंदिन ये-जा याच रस्त्यावरून असायची. मात्र, संबंधित शेतकऱ्याने रस्ता अडवल्यामुळे शेतकऱ्यांचा शेतीमाल शेतातच सडू लागला होता. क्रूरतेची हद्द म्हणजे, शाळकरी मुलांना पायपीट करावी लागत होती, तर आजारी वृद्धांना रुग्णालयात नेण्यासाठी ग्रामस्थांना डोक्यावर खाट घेऊन जाण्याची कसरत करावी लागत होती. ग्रामस्थांनी सुरुवातीला सामोपचाराने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला, पण समोरून नकार मिळाल्याने अखेर त्यांनी तहसीलदार धीरज मांजरे यांच्या कोर्टात 'रस्ता केस' दाखल केली. कायदेशीर सुनावणीनंतर तहसीलदारांनी थेट रस्ता खुला करण्याचे आदेश डोळासणे मंडळाधिकाऱ्यांना दिले.

**...आणि पोलिसांची गाडी गावात आली!**

**मंगळवारी सकाळी मंडळ अधिकारी ज्ञानदेव बेल्हेकर, कोतवाल आदिनाथ कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक अजय कौटे आणि पोलीस फौजफाट्याने धुमाळवाडीत एन्ट्री केली. कोणताही विरोध न जुमानता प्रशासनाने हा रस्ता कायदेशीररित्या मोकळा केला.**

पिढ्यान् पिढ्या सुरू असलेला रस्ता अचानक बंद झाल्याने आमचे जगणे कठीण झाले होते. आज प्रशासनाने आम्हाला न्याय दिला, अशा भावना तुषार करंजेकर, कमल करंजेकर, अनिता करंजेकर, विकास करंजेकर, मच्छिंद्र केदार, भाऊसाहेब दुधवडे यांच्यासह उपस्थित अबालवृद्ध व महिलांनी व्यक्त केल्या. रस्ता मोकळा झाल्याच्या आनंदात ग्रामस्थांनी प्रशासनाचे जाहीर आभार मानले असून संपूर्ण परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

## रस्ता क्रॉस करताना अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुण ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अमोल गावडे हा तरुण दि. २९ जून रोजी रात्रीच्या दरम्यान त्याच्या मोटरसायकलवर कोल्हार येथून डिग्रस येथे घरी जात होता. दरम्यान डिग्रस फाटा येथे अमोल गावडे हा रस्ता क्रॉस करत असताना अज्ञात वाहनाने मोटरसायकल ला दिलेल्या धडकेत अमोल गावडे हा तरुण जागीच ठार झाला.



अमोल पाराजी गावडे, (वय २९ वर्षे) हा तरुण राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे कुटुंबासह राहत असून तो कोल्हार येथील एका बँकेत नोकरी करत होता. दि. २९ जून २०२६ रोजी रात्री अमोल गावडे हा बँकेतील काम आटोपून त्याच्या मोटरसायकलवर कोल्हार येथून डिग्रस येथे घरी जाण्यासाठी निघाला होता. रात्री १० वाजे दरम्यान अमोल गावडे हा डिग्रस फाट्या जवळ रस्ता क्रॉस करीत असताना त्याच्या मोटरसायकलला एका अज्ञात वाहनाने भरगाव वेगात धडक दिली. या धडकेत अमोल गावडे हा जागीच ठार झाला. अपघात इतका भयानक होता कि, मोटारसायकलचा अक्षरशः चक्काचूर झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील काही तरुणांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच सहाय्यक फौजदार


तुळशीदास गिते व पोलिस नाईक सागर नवले यांनी घटनास्थळी हजर राहुन स्थानिक तरुणांच्या मदतीने अमोल जाधव याला रुग्णवाहिकेतून राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले.

या घटनेमुळे डिग्रस परिसरात शोक व्यक्त करण्यात येत असून मयत अमोल पाराजी गावडे याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक अकरा महिन्यांचा लहान मुलगा आहे. पाराजी गावडे याच्या मृतदेहावर दि. ३० जून रोजी सकाळी डिग्रस येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रसंगी परिसरातील नागरिक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाशिक कुंभमेळ्याच्या विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही– मंत्री उदय सामंत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी आवश्यक विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून कोणत्याही कामाला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली.



नाशिक कुंभमेळ्यासाठी विविध विकासकामांना सविस्तर प्रकल्प अहवालअभावी प्रशासकीय मंजुरी दिल्याबाबत सदस्य सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी सदस्य पंकज भुजबळ यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की, कुंभमेळ्यासाठी केंद्र व राज्य शासनासह विविध यंत्रणांमार्फत एकूण ३४ हजार ७३२.३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आवश्यक निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार आहे.

कुंभमेळ्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीला आवश्यकतेनुसार कामांमध्ये बदल करणे तसेच नवीन कामांचा समावेश करण्याचे अधिकार देण्यात आले असल्याने या कामांसाठी स्वतंत्र डीपीआरची आवश्यकता नसल्याचेही मंत्री सामंत यांनी यावेळी नमूद केले.

## सोनई पोलिसांची गांजा ओढणाऱ्या विरोधात धडक कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत सार्वजनिक ठिकाणी गांजा या अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या तिघांविरुद्ध सोनई पोलिसांनी स्वतंत्र कारवाया करून गुन्हे दाखल केले आहेत. अमली पदार्थांच्या सेवनाविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

**तिघांविरुद्ध गुन्हे दाखल**

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ जून रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास लांडेवाडी ता. नेवासा येथील भाऊसाहेब अहिलाजी फलके (वय ७२) हे सोनई बसस्थानक परिसरातील झाडाच्या आडोशाला गांजाचे सेवन करताना आढळून आले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल गणेश गावडे यांच्या फिर्यादीवरून एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर घोडेगाव येथे एका वडापावच्या दुकानाच्या आडोशाला राजू भास्कर बऱ्हाटे (वय ५८, रा. बऱ्हाणपूर ) हा गांजा ओढताना पोलिसांना आढळून आला.तसेच झापवाडी येथील मार्केट यार्डसमोर आबासाहेब कारभारी सोनवणे (वय ४०, रा. झापवाडी) हा गांजाचे सेवन करताना मिळून आला. या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलीस कॉन्स्टेबल भगवान वाघमोडे यांच्या फिर्यादीवरून संबंधितांविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क) सह कलम २७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या सर्व प्रकरणांचा पुढील तपास पोलीस हवालदार सचिन चौधरी करीत असून, अमली पदार्थांचे सेवन व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा धडाका पुढेही सुरू राहणार असल्याचे सोनई पोलिसांकडून सुरु राहणार असल्याचे सपोनि अनिल मोरे यांनी सांगितले.

# अहमदनगर मर्चंट्स बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहमदनगर मर्चंट्स को-ऑप. बँकेच्या चेअरमनपदी संजय चोपडा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीसाठी बँकेच्या संचालक मंडळाच्या सदस्यांची सभा मंगळवार दि. ३० जून २०२६ रोजी सहकारी संस्था सहायक निबंधक गणेश ओटी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. चेअरमन पदासाठी संजय चोपडा यांचे नाव संचालक मोहन बरमेचा यांनी सुचविले व त्यास संचालक अनिल पोखरणा यांनी अनुमोदन दिले.

या निवडीप्रसंगी मावळते चेअरमन हस्तीमलजी मुनोत, विद्यमान व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पुराणिक, जॉईंट सी.ई.ओ. नितिन भंडारी आदि उपस्थित होते.

तसेच बँकेचे संस्थापक व मावळते चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाची कार्य करण्याची पद्धत चांगली आहे, असे म्हटले. यावेळी व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, संजीव गांधी, श्रीमती मीनाताई मुनोत, संजय बोरा, विजय कोथिंबीरे यांची शुभेच्छापर समयोचित भाषणे झाली. बँकेचे नूतन चेअरमन संजय चोपडा यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, बँकेचे संस्थापक हस्तीमलजी मुनोत यांनी बँकेला ज्या प्रगतीपथावर नेले आहे तसेच बँकेचा नावलौकिक



केलेला आहे. त्या नावलौकिकास मी कुठलाही तडा न जाऊ देता बँकेच्या नावलौकिकात अधिकाधिक भर घालीन. सदरचे पद हे काटेरी खुर्चीप्रमाणे आहे. सर्व संचालकांना सोबत घेऊन बँकेची प्रगती करील. हस्तीमलजी मुनोत यांचे जे स्वप्न आहे, की सभासदांना रक्कम रुपये ५,१००/- ची मुदत ठेव पावती देण्याचा, यासाठी मी पाठपुरावा करून प्रस्ताव मंजूर करीत हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते ठेव पावतीचे वितरण करण्यात येईल. बँकेचे संस्थापक व मावळते चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी आपल्या भाषणात मी बँकेच्या ज्या प्रगतीचे स्वप्न पाहिलेले आहे त्याच प्रकारे बँकेची प्रगती होत असून नूतन चेअरमन संजय चोपडा हे चेअरमन पदाची कामगिरी अत्यंत उत्कृष्टरित्या पार पाडतील असा विश्वास व्यक्त करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

निवडणूक अधिकारी गणेश ओटी यांचा बँकेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

संजय चोपडा यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. बँकेच्या बाहेर मित्र परिवाराच्या वतीने ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करण्यात आले

**■ संजय चोपडा हे अहिल्यानगर शहरातील प्रख्यात उद्योजक असून अ.नगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आहेत. तसेच यापूर्वीही त्यांनी बँकेच्या चेअरमन पदाचा कार्यभार सांभाळलेला होता. या प्रसंगी सभाध्यक्ष गणेश ओटी यांनी बँकेचे नूतन चेअरमन चोपडा यांचा सत्कार करून त्यांना त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या व बँकेची उत्तरोत्तर भरभराट होण्यासाठी त्यांनी बँकेस शुभेच्छा दिल्या.**